



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक ५७ * नांदेड * रविवार, दि. १ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## आंध्र प्रदेशमध्ये फटाक्याच्या कारखान्यात भीषण स्फोट, २० जणांचा मृत्यू, ६ गंभीर



**समलकोट (वृत्तसंस्था)–** आंध्र प्रदेशातील काकीनाडा जिल्ह्यातील समलकोट मंडल येथील वेतलापलेम येथील एका फटाक्याच्या कारखान्यात भीषण स्फोट झाला आहे. यामध्ये २० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळाली आहे. तर सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. कारखान्यात २० हून अधिक लोक उपस्थित होते.

स्फोटाची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. आग विझवण्याचा प्रयत्न सुरू केला. स्थानिक रहिवाशांनीही मदत केली. जखमींना रुग्णवाहिकेने रुग्णालयात नेण्यात आले. गंभीर भाजलेल्यांपैकी अनेकांची प्रकृती गंभीर आहे. स्फोटात मृतदेहांचे तुकडे झाले आणि जवळच्या इमारतींचेही मोठे नुकसान झाल्याची माहिती मिळत आहे.

हा आत्तापर्यंतचा राज्यातील सर्वात मोठा स्फोट असल्याची माहिती पर्यटनमंत्री दुर्गेश यांनी दिली आहे. अद्याप संपूर्ण माहिती मिळालेली नाही. सध्या काही जखमी झालेल्या लोकांवर उपचार सुरु आहेत. समरलाकोटा मंडलच्या वेट्टलापलेम गावात झालेल्या स्फोटाची तीव्रता इतकी जास्त होती की मृतदेह जवळच्या भातशेतीत पडले आहेत. काकीनाडा सरकारी जनरल हॉस्पिटलच्या अधीक्षकांनी सांगितले की, ९० ते १०० टक्के भाजलेल्या सात रुणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, या घटनेबद्दल आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू यांनी शोक व्यक्त केला आहे. काकीनाडा जिल्ह्यातील वेट्टलापलेम गावात फटाके उत्पादक युनिटमध्ये झालेल्या स्फोटात झालेली जीवितहानी अत्यंत दुःखद आहे असे ते म्हणाले.

## अमेरिका-इस्त्रायलविरूद्ध इराण युद्धाला सुरूवात

### इराणच्या अनेक शहरांवर हल्ले; इराणकडूनही प्रत्युत्तर, इस्त्रायलवर ४०० क्षेपणास्त्रे डागली

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अमेरिका-इस्त्रायलविरूद्ध इराणमध्ये युद्धाला सुरूवात झाली आहे. इस्त्रायल आणि अमेरिकेनं संयुक्त कारवाईत इराणची राजधानी तेहरानसह अनेक शहरांवर हल्ला केला. प्रत्युत्तर म्हणून इराणने इस्त्रायलवर प्रत्युत्तरात्मक हल्ले केले. मीडिया रिपोर्ट्सनुसार, इराणने अंदाजे ४०० क्षेपणास्त्रे डागून प्रत्युत्तर दिले.

इस्त्रायल व्यतिरिक्त, इराणने कुवेत, कतार, बहरीन आणि सौदी अरेबियामधील अमेरिकन तळांवरही हल्ला केला. इराणने युएईचे सर्वाधिक लोकसंख्या असलेले शहर दुबईलाही लक्ष्य केले. इस्त्रायलने इराणचे गुप्तचर मंत्रालय, संरक्षण मंत्रालय, सर्वोच्च नेते खमेनी यांचे कार्यालय आणि इराणच्या अणुऊर्जा संघटनेला लक्ष्य केलं आहे. हल्ल्यानंतर इराणचे सर्वोच्च धर्मगुरु अयातुल्ला अल खमेनींना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आलं आहे.

इराणच्या एका वृत्तसंस्थेनुसार, कतारमधील अल-उदेद हवाई तळ, कुवेतमधील अल-सलेम हवाई तळ, संयुक्त अरब अमिरातीमधील अल-धफ्रा हवाई तळ आणि बहरीनमधील पाचव्या अमेरिकन तळावर इराणी क्षेपणास्त्र हल्ल्यांचे लक्ष्य करण्यात आले.

एका वृत्तसंस्थेने वृत्त दिले की, युएईची राजधानी अबू धाबीमध्ये एक शक्तिशाली स्फोट झाला.

इराणचे सर्वोच्च नेते खामेनी तेहरान सोडले आहेत. द गार्डियनने दिलेल्या वृत्तानुसार त्यांना सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले आहे. रॉयटर्स आणि न्यू यॉर्क एका वृत्तवाहिनीनुसार अमेरिका आणि इस्त्रायली हल्ल्यांचे मुख्य लक्ष्य इराणी अधिकारी होते.

इराणने इस्त्रायलच्या शेजारील देश बहरीनमधील अमेरिकेच्या लष्करी तळावर अनेक क्षेपणास्त्रे डागली आहेत. अमेरिका कतारच्या अल उदेद हवाई तळावर आहे. कतारकडून एक इराणी क्षेपणास्त्र रोखण्यात आले. कतारच्या संरक्षण मंत्रालयाने म्हटले आहे की त्यांच्या पॅट्रियट संरक्षण यंत्रणेने इराणी क्षेपणास्त्र रोखले.

## उद्यान विभागातील कर्मचाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश

### उद्यान विभागातील गणेश हनमंते निलंबित

### बुकिंग कॉऊंटरवरील पैशांवर डल्ला मारल्याचे प्रकरण




**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील महानगरपालिकेच्या उद्यान विभागातील एका कर्मचाऱ्याविरुद्ध गंभीर अनियमिततेच्या आरोपांवरून गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. एवढेच नाही तर मुख्य उद्यान अधीक्षकांच्या आदेशावरून संबंधित कर्मचाऱ्याला निलंबित करण्यात आले आहे. यावरून उपमहापौर दीपकसिंह रावत यांनी महापालिकेत भ्रष्टाचारी कर्मचाऱ्यांच्याविरुद्ध पहिला दणका दिला आहे.

मुख्य उद्यान अधीक्षकांच्या २५ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या अहवालानुसार, उद्यान विभागातील गणेश मरीबा हनमंते (माळी, प्र. लिपिक) यांनी माता गुजरीजी विसावा उद्यानाच्या प्रवेश शुल्क बुकि काउंटरवर आपल्या मुलीच्या नावाने असलेल्या अकाऊंटवर क्यूआर कोड स्कॅनद्वारे तिकीटांचे पैसे स्वीकारल्याचा प्रकार स्वतः उपमहापौर दीपकसिंह रावत यांनी उघडकीस आणला होता.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत संबंधित कर्मचाऱ्याला तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. तसेच सदर प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी मुख्य उद्यान अधीक्षकांना प्राधिकृत करण्यात आले आहे. उप आयुक्त (प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांनी आदेश जारी करत या प्रकरणाचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणात अजून काही दोषी आढळले तर त्यांनाही सोडण्यात येणार नसल्याचे महापालिका प्रशासनाने सांगितले आहे.

## थार गाडी देतो म्हणून पुण्यातील दोघांनी शेतकऱ्याला ४ लाखांना गंडविले; दोघांविरूद्ध गुन्हा दाखल

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** चारचाकी थार गाडी स्वस्तात मिळवून देतो, असे आमिष दाखवून अर्धापूर येथील एका शेतकऱ्याची ४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पुण्यातील दोन एजंटांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून बोगस चेक देऊन फसवणूक केल्याप्रकरणी दोन आरोपी पोलिसांच्या रडारवर आहेत.

अर्धापूर येथील तक्रारदार शेतकरी यांना चारचाकी गाडी घेण्यासाठी त्यांनी जुन्या गाड्यांचे खरेदी-विक्री करणारे एजंट प्रफुल प्रभाकर उबाळे आणि नारायण रामलू रामदीनवार दोघे रा. ईशा एम्पायर, चिंतामणी नगर, पुणे यांच्याशी संपर्क साधला. आरोपींनी व्हॉट्सअॅपवर गाड्यांचे फोटो पाठवून तक्रारदाराचा विश्वास संपादन केला व ऍडव्हान्स म्हणून २५, १५० रुपये फोनपे द्वारे घेतले. नंतर गाडी फायनल झाल्याचे सांगून उर्वरित ३, ७५, ००० रुपये नारायण रामदीनवार यांच्या बँक' खात्यात आरटीजीएसद्वारे भरून घेतले. पैसे भरूनही गाडी मिळत नसल्याने तक्रारदाराने पैशांचा तगादा लावला, तेव्हा प्रफुल उबाळे याने ६ जानेवारी २०२६ रोजीचा ४ लाखांचा धनादेश दिला. तक्रारदाराने हा चेक अर्धापूर येथील एका बँकेच्या जमा केला असता, संबंधित खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने तो बाऊन्स झाला. गाडीही नाही आणि पैसेही परत मिळेनात या कारणाने शेतकरी स्वराज देशमुख यांच्या तक्रारीवरून दोन्ही आरोपींविरूद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुढील तपास पोउनी सुरेश भोसले हे करीत आहेत.

## घरगुती गॅसचा काळाबाजार; ४६ सिलेंडर जप्त, आरोपीस अटक

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** घरगुती गॅसचा काळाबाजार सध्या वाढला आहे. या पद्धतीने घरगुती गॅसचा ऑटोरिक्षामध्ये इंधन म्हणून वापर करणाऱ्या मुदखेड शहरातील एका अड्ड्यावर धाड टाकण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या या कारवाईत दीड लाख रूपयांचे ४६ सिलेंडर जप्त करून एका आरोपीस पकडण्यात आले.

दि. २६ फेब्रुवारी रोजी प्राप्त झालेल्या माहितीवरून स्थानिक गुन्हा शाखा पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी कारवाईचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे व त्यांच्या पथकाने मुदखेड- भोकर जाणारे रोडलगत नवी आबादी येथे एका पत्र्याच्या शेडवर धाड टाकली. तेव्हा एक जण येथे अवैधरित्या घरगुती वापराच्या गैस सिलेंडरमधून इलेक्ट्रीक मोटारच्या सहाय्याने ऑटोमध्ये गॅस भरीत आढळून आला.

या कारवाईत अवैधरित्या बाळगलेले ४६ घरगुती गॅस सिलेंडर व १ इलेक्ट्रीक मोटार, १ इलेक्ट्रीक वजन काटा असा एकूण दीड लाखांचा मुद्देमाल जप्त करुन आरोपी शेख अय्युव शेख महेमुद (वय ४५) यास पकडण्यात आले. याप्रकरणी त्यास मुदखेड पोलिसांच्या ताब्यात देवून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पोलीस उपमहानिरीक्षक उमाप यांच्या पथकाकडून मटका, जुगार अड्ड्यांवर छापा

### नांदेड, परभणी जिल्ह्यात कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या पथकाच्या नांदेड व परभणी जिल्ह्यातील मटका व जुगार अड्ड्यावर छापा टाकला आहे.

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड शहरातील भाग्यनगर व परभणी जिल्ह्यातील ताडकळस भागात पोलीस पथक पाठविले होते.

सदर पथकाने, दिनांक २७.०२.२०२६ रोजी नांदेड शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत छत्रपती चौक येथे आर.एम.आर. कॉम्लेक्समध्ये मटका बुक्कीवर कारवाई करत, २४,३३०/- रुपयांची रोकड, ३० हजार रुपयांचे (०४) मोबाईल, १० हजार रुपयांचा एक लेनवो कंपनीचा टॅब व १५,००० रुपयांचे इतर साहित्य असा एकूण ७९,३३०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण (७) आरोपीतांना ताब्यात घेवून, त्यांचेविरुध्द भाग्यनगर पोलीस ठाणे येथे गुरनं १०६/२०२६ कलम ४, ५, १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदवून, त्याचा तपास भाग्यनगर पोलीस ठाण्यातील सपोउपनि रावसाहेब जाधव यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, आज दि. २८/०२/२०२६ रोजी दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास सदर पथकाने, परभणी जिल्हयातील ताडकळस पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या मौजे लिमला येथील राजकला क्रिडा व सांस्कृतिक मंडळ येथे छापा टाकून, सदर ठिकाणी जुगार खेळणाऱ्या (१८) आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून २०,९००/- रुपयांची रोकड व २ मोबाईल फोन हस्तगत केले आहेत. सदर क्रीडा व सांस्कृतिक मंडळ हे मूळ चिंचवडगांव, ता. वडवणी, जिल्हा बीड येथील पत्त्यावर नोंदणीकृत असून, त्याची प्रशिक्षण शाखा ही मौजे लिमला चालत असल्याचे व सदर ठिकाणी लोकांना पत्ते खेळण्याचे प्रशिक्षण देत असल्याचे, मॅनेजर कैलास शिंदे यांच्याकडून सांगण्यात आले. मात्र, यासंबंधीचे (पान ३ वर...)

## हमीभावाने चणा खरेदीसाठी शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)–** केंद्र शासनाचे किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत एनसीसीएफच्यावतीने नांदेड जिल्ह्यात खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये हमीभावाने चणा खरेदीसाठी १ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत ऑनलाईन पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी एकूण २३ खरेदी केंद्र निश्चित करण्यात आले आहेत.

तालुका खरेदी विक्री संघ मुखेड, हदगाव, बिलोली (कासराळी), लोहा, कुंडलवाडी विविध कार्यकारी से.सह.सो. कुंडलवाडी ता.बिलोली, नांदेड जिल्हा फळे व भाजीपाला सह.संस्था (अर्धापुर), पंडित दीनदयाल उपाध्याय अभिनव सह. संस्था देगलूर, ता.देगलुर, बळीराम पाटील फळे व भाजीपाला सह.ख.वि.संस्था (बेरळी) ता.मुखेड, मुखेड फळे व भाजीपाला सह.ख.वि.संस्था (उमरदरी) ता.मुखेड, किनवट तालुका कृषिमाल प्रक्रिया सह. संस्था गणेशपूर (ता. किनवट), जय महाराष्ट्र शेतीमाल खरेदी विक्री सह.संस्था (कौठा) ता.कंधार, स्वामी विवेकानंद अभिनव (पान ३ वर...)

## वजिराबाद पोलीस ठाण्याच्या प्रांगणात बालकांसाठी चिल्ड्रन पार्कचे नुतनीकरण


### पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप आणि एसपी अबिनाश कुमार यांच्या हस्ते उद्घाटन



**नांदेड (प्रल्हाद कांबळे)–** खेळाचे महत्व समजावे व अनेक सवंगडी एकत्र येऊन त्यांचाही सुसंवाद व्हावा या हेतूने वजिराबाद पोलीस ठाण्यात पुनर्जीवित करण्यात आलेल्या चिल्ड्रन पार्कचे उद्घाटन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप आणि पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते शुक्रवारी रोजी करण्यात आले. या चिल्ड्रन पार्कसाठी पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांनी संतबाबा बलविंदर सिंघ यांच्या मदतीने या चिल्ड्रन पार्कला पुनर्जीवित केले.

नांदेड शहर हे अतिशय गर्दीचे ठिकाण म्हणून ओळखले जात आहे. महानगरपालिकेचे मोकळे भूखंड काही ठिकाणी विकासाच्या नावाखाली विकासकांना देण्यात येत आहेत. वजिराबाद पोलीस ठाण्यात पोलिसांच्या पाल्यांना करमणुकीचे साधन म्हणून व त्यांना खेळाची आवड निर्माण होण्यासाठी पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्या पुढाकारातून बंद पडलेले चिल्ड्रन पार्क पुन्हा सुरू झाले आहे.

या उद्घाटन सोहळ्याला अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्यासोबतच उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने, वजिराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्यासह त्यांचे सर्व सहकारी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.




## युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताकडून विशेष सुचना जारी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पश्चिम आशियामध्ये इराण आणि इस्त्रायलमध्ये भीषण युद्धाला सुरुवात झाली असून परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण बनली आहे. शनिवारी इस्त्रायलने अमेरिकेसोबत संयुक्त कारवाई करत इराणवर हल्ला चढवला. त्यानंतर तेहराननेही तातडीने प्रत्युत्तर देत पश्चिम आशियामधील अमेरिकन एअरबेसवर क्षेपणास्त्र हल्ले केल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकारकडून अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आली आहे. वाढत्या संघर्षामुळे जागतिक पातळीवर चिंता व्यक्त केली जात आहे.

परराष्ट्र मंत्रालय यांनी इस्त्रायल-इराण संघर्षाबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. मंत्रालयाने म्हटले आहे की, इराण आणि आखाती प्रदेशातील अलीकडील घडामोडींमुळे भारत अत्यंत चिंतित आहे. सर्व संबंधित पक्षांनी संयम बाळगावा, तणाव वाढू नये यासाठी प्रयत्न करावेत आणि सामान्य नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



# सालगडी

**कथा**

गोंद्याला शेवटचा अग्नी दिला. आयुष्यात आजच तो शांत झोपला होता. अन् तेही कायम चे. मागे रडणारे कुणी नव्हते. या बाबतीत तेवढा तो सुखी होता. मागच्या महिन्यातच त्याची म्हातरी बायको गेली. तिच्यासाठी फक्त गोंद्या रडला होता. गोंद्याला मुलं नव्हती. भावकीतल्या कुणीतरी त्याला अग्नी दिला. आता पुढील कार्य गोंद्याचे तोच करणार होता. त्या बदल्यात गोंद्याची झोपडी आणि सभोवलताची काही जागा त्याला मिळणार होती. गोंद्याच्या जाण्याने कुणाला दु:ख नव्हते. फक्त थोडीफार हळहळ होती.

पठारी नावाचे एक आडवळणावर असणारे खेडे, हे गोंद्याचे गाव होते. आईवडलांच्या विवाह पश्चात जन्माला आलेले एकुलते एक बाळ म्हणजे गोंद्या. आईवडीलांचे भांडवल म्हणजे त्यांचे सुखरूप असणारे हात पाय. याच भांडवलावर कुणातरी शेतकऱ्याकडे मजुरी करून तिघांचे पोट भरत होते. गोंद्या मोठा झाला, म्हणजे रानात शेळ्या गुरांच्या राखणी एवढा. मग पुढे त्याचे पोट त्यालाच भरावे लागले. गुरं राखण्याची गोंद्याला काही मजुरी मिळत नव्हती. फक्त तीने वेळेला जेवण मिळत होते. गावातल्या मजुरांच्या मुलाला हेही भरपूर होते. कुठल्यातरी शेतकऱ्याची गुरं किंवा शेळ्या राखायच्या. तो काही जेवण देईल, त्यावर दिवस ढकलायचा. रानात गेल्यावर रानमेवा हाच गोंद्याचा खुराक होता. परंतु असे जास्त दिवस चालणारे नव्हते. गोंद्या थोराट बाप्या दिसायला लागला. आता त्याचे दोनाचे चार हात करायला लागतील. गरीबी असली तरी सुज्ञ पालकांचा विचार या बाबतीत कमी ठरत नाही. आणि वधू संशोधनाला सुरवात झाली.

वधू मिळायला कठिण नव्हते. अपेक्षा दोन्हीकडून नव्हत्या. परंतु आता लग्न कसे करायचे?. दोन्ही पक्षांपुढे हाच मोठा गुंता होता. कारण सर्व सोंगे करता येतात. पैशाचे सोंग करता येत नाही. घरची फाटकी झोळी असली तरी समाज काय म्हणेल?. या समाज काय म्हणेल?. या वाक्याने अनेक कुटुंबाची प्रगती होऊ दिलेली नाही. वधु पक्षाने पुर्णपणे हात वर केले.

आमच्या जवळच काही नाही, तर मुलीला काय देणार?. जे काय करायचे ते तुम्हीच करा. तुम्हाला मुलगी जरी बिन लग्नाची घेऊन जायची असेल, तरी आमची हरकत नाही.

गोंद्याच्या आईवडीलांनी बिना लग्नाची मुलगी घरी आणायचा विचारही केला होता. परंतु नको समाज काय म्हणेल?. ज्या मुलाला जन्म दिला. त्याचे लग्नही तुम्ही करू शकत नाही. मग सुरवात झाली कुणी सावकार बघायला. जो लग्नासाठी कर्ज देतो का ते. गावात काही त्यांना सावकार मिळाला नाही. कारण तारण ठेवायला काही नाही. ही माणसं कर्ज फेडणार तरी कशी?. खूप शोधाशोध केल्यावर शेजारच्या गावातला एक मध्यमवर्गीय शेतकरी यांना कर्ज द्यायला तयार झाला. कर्जाचे स्वरुप असे होते. लग्नाला जो काही खर्च येईल, तो शेतकरी पुरवणार होता. त्या बदल्यात गोंद्याने आणि त्याच्या पत्नीने त्या शेतकऱ्याकडे दहा वर्ष चाकरी करायची. गोंद्याचा आणि त्याच्या पत्नीच्या खावटीचा खर्च, सणावाराचा खर्च, घोंगडी पायताण, वर्षाला नवी कापडं शेतकरी पुरवणार होता. गोंद्या आणि त्याची बायको समाज मान्यतेने एकत्र येण्यासाठी, लग्नाअगोदरच सालबंदी झाले. पठारी नि आपटी या दोन्ही गावचे सरपंच, पाटील, आणि दोन्ही गावातले पाच पंच समक्ष व्यवहार ठरला. चारचौघा सारखे लग्न पार पडले. लग्नानंतर पंधरा वीस दिवसात पठारीतले घर आईवडील सोडून गोंद्याला आपटीत यावे लागले. पठारी सोडतांना गोंद्याला जिवावर बेतले होते. परंतु पर्याय नव्हता. आपटीतल्या गावकुसाच्या मोकळ्या जागेत गोंद्याने झोपडे उभे केले. मालकाने संसाराचे सामान त्याला आणून दिले. घरात अन्नधान्य दिले. गोंद्याचा नवा संसार सुरू झाला.

दुसऱ्या कोंबड्याला गोंद्या उठायचा. पहिल्या कोंबड्याला जाग यायची परंतु तो उठत नव्हता. पहिला कोंबडा आरवल्यावर जाग येऊन फायदा नव्हता. कारण इंद्रिये असहकार पुकारायचे. त्यांचाही दोष नसायचा. काल दिवसभर त्यांना यानेच पिळून घेतले होते. सात आठ तास झोपूनही त्यांचा शीणभाग उतरत नव्हता. मग तोही इंद्रियांचा ऐकायचा नि पडून राहयचा. परंतु त्याच्या कारभारनीला इंद्रियांचे ऐकून जमत नव्हते. ती उठायची आणि चूल पेटवायची. जणू काही पहिला कोंबडा पत्नीसाठी आणि दुसरा कोंबडा पतीसाठी अरवत होता. निसर्गाने हेच गुणवैशिष्ट्य कोंबड्यात भरले आहे. काहींना कोंबड्याची गुणवत्ता जिभेवर समजते. न चुकता साडेचार पासून तो माणसाला जागे करायची सुरवात करतो. हेच पुर्वीचे घड्याळ होते.

पहिल्या कोंबड्याला उठल्यावर चूलीवरच्या कढत पाण्याने चूळ भरायचा. चुली समोरच बाडगीच्या फुटक्या तुकड्यावर करपवलेल्या, तंबाखूच्या मशेरीला तळहातावर घेऊन पटापट दात घासायचा. चूलीवरच्या पातेल्यातले, तांब्याभरून कढत पाणी घेऊन तोंड स्वच्छ करायचा. झोपडीच्या दारात लटकवलेल्या घोंगडीची खोल करून डोक्यावर घ्यायचा. कोपऱ्यात उभ्या काठीला हातात घेऊन मालकाचे घर गाठायचा. याला दारात बघताच मालकीन बाई चहाचा कप आणून द्यायची. चहा घेतला की तो वळायचा गोठ्याकडे. याचा कानोसा घेतल्यावर बैलही निवांत पहुडलेले जागे व्हायचे. बैलांना दावणीशी मोकळे करून त्यांच्या मागे नांगर डोक्यावर घेऊन गोंद्या निघायचा. पायाखाली अंधार असायचा. मालकाच्या शेतात नांगर ठेऊन, तो बैलांना चारायला जायचा. एकदा लख्ख उजाडले की हा बैल घेऊन शेतात यायचा. बैलांची पोटं टम्म भरलेली असायची.

बैलाच्या नि त्याच्या आयुष्यात बरेचसे साम्य होते. दोघांनी इनामेऐतबारे मालकाची सेवा करायची. बस्स. .आणखी आयुष्यात नावीन्य काहीच नाही. कदाचित हा विचारही गोंद्याला शिवत नसेल. भावनांना खतपाणी घालण्यासाठी नवे विश्व त्याच्याकडे नव्हते. आता गोंद्याने नांगर जुंपलेला असायचा. इकडे त्याची कारभारीण घरातली आवराआवर झाली की मालकाच्या घरी यायची. तिलाही मालकीण बाई आल्याआल्या चहा द्यायची. चहा घेतला की ती गोठ्याकडे वळायची. गुरांचे शेण भरून गवनीवर टाकायची. गोठा झाडून पुसून स्वच्छ करायची. मालकाच्या घरचे पाणी भरायची. रात्रीची भांडी घासायची. भांडी घासून झाले की मालकीण बाई तिला सकाळचे जेवण द्यायची. जेवण केले की ती शेतावर हजर व्हायची. आता दिवस चांगलाच माथ्यावर आला असायचा. नांगर हकलून गोंद्याला कडाडून भूक लागली असायची. बैलांनी सकाळीच चांगले जेवण केलेले असायचे. गोंद्याला तसी सोय नव्हती. राहूनराहून त्याचे लक्ष वाटेकडे वळायचे. मालकीण बाई भाकऱ्यांची पाटली घेऊन येतांना दिसते का?. मग घटकाभर तो नांगर उभा करायचा. जवळील चंचीतून तंबाखू आणि चूना घेऊन मळायचा. जिभेखाली तंबाखू भरली की पुन्हा, बैलांना आवाज देत काठीखाली फटकारायचा. याची नजर चुकायची आणि मालकीण बाई भाकऱ्या घेऊन हजर व्हायची. मग हा लगबगीने बांधावर यायचा. हात कसेतरी धुवून हातावर भाकरी घेऊन खायचा. शेतातीलच ओढ्यावरचे ओंजलीने पाणी पिऊन पोट गच्च करायचा. नांगराला बैलांचे उभ्यानेच रवंथ सुरू असायचे. मग दुपारचे जेवण थोडे उशिरा व्हायचे. संध्याकाळी मालकाच्या बैलांना काळोख पडेपर्यंत चारायचे रात्री मालकाचे बैल गोठ्यात नेऊन बांधले की हा मोकळा व्हायचा. उद्या सकाळी दुसरा कोंबडा आरवे पर्यंत.

असे आठ एक वर्ष गोंद्याने मालकाकडे काढली. सालबंदी संपायला दोनएक वर्ष शिल्लक होतीच तर. गोंद्याचे वडिल वारले आणि पुन्हा त्यांच्या कार्यासाठी गोंद्याला मालकाकडे पाच वर्षाची सालबंदी घ्यावी लागली. बालपण गावातल्या शेळ्या राखतांना गेले. तरूणपणाची पंधरा वर्ष मालकाचे कर्ज फेडतांना गेले. या पंधरा वर्षात घरात काही पाळणा हलला नाही. तसेही गोंद्याला वाटायचे. बाळाला जन्म देऊन पुढे काय?.

जे माझ्या वडीलांनी केले तेच मी करतोय. पुढे माझा मुलगा करील. आयुष्यात बदल काहीच नसेल तर. कशाला जन्म देऊन त्यालाही असेच गुरासारखे जगायला प्रवृत्त करायचे. परंतु स्त्री सुलभ स्वाभानुसार त्याच्या पत्नीला बाळ असावे, असे मनातून वाटत होतेच. म्हणून तिच्यासाठी गोंद्याने भायभगत पाहिले. परंतु यश आले नाही. आणि त्यांनी प्रयत्न सोडले. एकमेकाशिवाय त्यांना दुसरे कुणी नव्हते. लग्नाचे कर्ज फिटले होते. वडीलांच्या अंतिम विधीचे कर्ज अजून होते. आणखी एक सुगी झाली की तेही फिटणारच होते. आणि अचानक एक दिवस आई वारली. वडीलसाठी पाच सुग्या काढल्या मग आईसाठी का नको. आणि गोंद्याच्या आयुष्यात पाच सुग्या आणखी वाढल्या. आयुष्याची वीस वर्ष सरली. आता मालकाचे काही राहिले नव्हते. गोंद्या बंधन मुक्त झाला. गोंद्याला जन्म गावाची आठवण होती. त्याने पुन्हा गावी येऊन जे काही मिळेल. ते करायचे ठरवले. तो गावी आला. पहिल्या मालकाने त्याला अन्नधान्य व स्वखुशीने पैसे दिले. नेमका त्यावर्षी दुष्काळ होता. बरीच मजुर कुटुंबे रोजगारा निमित्त स्थलांतरीत झाली होती. गोंद्याला गावात रोजगार मिळेना. आपटीच्या मालकाने दिलेले पैसे आणि धान्य संपत आले होते. शेवटी दोघा पतीपत्नीने जुन्या मालकाकडे पुन्हा रोजगारासाठी विचारणा केली. दिवस दुष्काळाचे होते. तरीही जुन्या मालकाला गोंद्याला टाळता आले नाही. कारण वीस वर्ष गोंद्याने इनामेऐतबारे मालकाची चाकरी केली होती. गोंद्या मालकाच्या घरातील सदस्य झाला होता. आता गोंद्याने निर्णय घेतला की मालकाला सोडायचे नाही. तसेही वय वाढू लागले आहे. मुलंबाळ काही नाहीत. कमवायचे कुणासाठी नाही. फक्त जगायचे आहे. तीन वेळेचे अन्न मिळाले पुष्कळ झाले. गोंद्याने संपूर्ण आयुष्य एका मालकाकडे काढले. .


मागच्या महिन्यात गोंद्याची पत्नी गेली. गोंद्या लहान बाळा सारखा रडला. त्याला जगण्यासाठी फक्त तीच होती. त्याच्या सुखदु:खाची संगती. आईवडील गेले गोंद्या परका झाला नाही. परंतु पत्नीच्या जाण्याने गोंद्या पोरका झाला. आता जगण्याची इच्छा उरली नाही. आयुष्यभर फक्त पोटभरण्यासाठी काबाडकष्ट केले होते. पत्नीच्या मृत्यूनंतर गोंद्याही काही दिवसात गेला. त्याला रडणारे कुणी नव्हते. मालकाला दु:ख झाले. गोंद्याला ओळखणारे थोडेफार हळहळले. कुणीतरी बोलले. .आयुष्यभर कष्ट उपसले म्हाताऱ्याने. प्रामाणिकपणे एकाच मालकाकडे हयात घालवली. मुलबाळ काही नव्हते. नाकासमोर बघून चालला बिचारा. कुणाचे काही बुडवून गेला नाही. कुणाला कधी दु:ख दिले नाही. .

हेच शब्द गोंद्याचे निवृती वेतन होते.

**प्रभाकर पवार**
मुरबाड, जि. ठाणे
मो. ९२२६१३०७१०

# अरसड : स्त्री जीवनाच्या होरपळीचा अस्सल दस्तऐवज

**पुस्तक परीक्षण**
**चंद्रकांत भोपाळकर**
नांदेड




लोकवाययगृहातून नुकतीच प्रकाशित झालेली व्यंकटेश सोळंके यांची 'अरसड' ही कादंबरी वाचनात आली. कादंबरी वाचून मन खूप अस्वस्थ झाले. ग्रामीण स्त्री व्यथा वेदनेचा दुर्लक्षित पट लेखकांनी अतिशय संवेदनशीलपणे मांडलेला आहे. नातेसंबंधातील स्वार्थ, दांभिकता आणि पुरुषी अहंकाराच्या विळख्यात सापडलेल्या स्त्रियांच्या जगण्यातील होरपळ अत्यंत प्रभावी आणि वास्तवदर्शी पद्धतीने लेखकांनी उभी केलेली आहे.

आज शहरी भागातील स्त्री शिक्षण, करिअर आणि स्वावलंबनाच्या प्रवाहात सहभागी होत स्वत:चे जीवनमान उंचावत आहे; परंतु ग्रामीण भागातील स्त्री अजूनही तथाकथित परंपरा, रूढी आणि पुरुषप्रधान मानसिकतेच्या चौकटीत अडकलेली दिसते. स्त्री स्वातंत्र्याची संकल्पना तिच्यासाठी अजूनही दूरच आहे. तिच्या स्वप्नांची राखरांगोळी कशी होते, तिच्या अस्तित्वालाच कसा अडसर निर्माण होतो? याचे जिवंत चित्रण या कादंबरीतून वाचायला व अनुभवायला मिळते.

या कादंबरीत एका स्त्रीच्या सासुरवाशीणपणातील छळाची वेदना आहे. त्याचबरोबर मुलाला पित्याच्या प्रेमापासून वंचित राहावे लागण्याची शोकांतिका आहे. मनी आणि तिचा मुलगा रमना यांच्या आयुष्याभोवती फिरणारे कथानक केवळ वैयक्तिक दु:ख मांडत नाही, तर समाजरचनेतील विकृतींवर बोट ठेवते. मोठ्या माणसांच्या स्वार्थी संघर्षात कोवळ्या बालपणाची होणारी करपणारी अवस्था करणारी व अतिशय विदारक आहे. माय लेकरांच्या दु:ख दैन्याची केविलवाणी अवस्था लेखकांनी अत्यंत भावस्पर्शी शब्दांत मांडली आहे.

कादंबरीतील पात्रे केवळ व्यक्तिरेखा राहत नाहीत; ती ग्रामीण समाजमनाचे प्रतिनिधी बनतात. विशेषत: 'मनीच्या बापाची' ही व्यक्तिरेखा आपल्या मुलीचा संसार सुखाचा व्हावा यासाठी सर्वस्व पणाला लावणाऱ्या बापाचे हृदयस्पर्शी चित्र साकारते. या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून लेखकांनी पितृत्वातील करुणा आणि जबाबदारी अधोरेखित केली आहे. स्त्रियांच्या व कौटुंबिक दु:खाला एखादी स्त्रीच जबाबदार असते. एखाद्या कुटुंबाचा भ्रम एक स्त्रीच अबाधित ठेवून त्या कुटुंबाचा उत्कर्ष वाढवू शकते हा संदेश या कादंबरीतून मिळतो.

या कादंबरीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे मराठवाड्यातील, विशेषत: नांदेड परिसरातील व मराठवाड्यातील ग्रामीण बोलीभाषेचा सहज आणि समर्थ वापर केलेला आहे. त्यामुळे कथानकाला अस्सलपणा लाभतो. वाचकाला ग्रामीण जीवनाचा प्रत्यय प्रत्यक्ष अनुभवासारखा येतो. श्रद्धा, परंपरा, प्रथा आणि सामाजिक धारणा यांतील विसंगती लेखकांनी नेमकेपणाने अधोरेखित केल्या आहेत.

'अरसड' या शिर्षकाला साजेशीच प्रतिकात्मकता संपूर्ण कादंबरीत दिसून येते. मनी आणि रमनाच्या आयुष्याची अवस्था जणू अरसड जमिनीसारखी झाली असली, तरी त्यांच्या संघर्षातून भविष्य भूमीत नवे पीक बहरून येईल, असा सकारात्मक आशावादी संदेश कादंबरीतून मिळतो. आशेची किरणरेषा कादंबरीला केवळ वेदनेचा दस्तऐवज न ठेवता संघर्षाची प्रेरणा बनवते. यातून सद्य पिढीला व्यथा वेदना बाजूला सारून नातेसंबंध जपण्याचे भान देते.

मिलिंद कडणे यांनी साकारलेले अर्थपूर्ण मुखपृष्ठ कादंबरीच्या आशयाला साजेसे असून तिच्या भावगर्भतेला अधोरेखित करते. लेखनशैलीतील सहजता, शब्दांची नेमकी निवड आणि बोलीभाषेचा प्रभावी वापर यांमुळे ग्रामीण जीवनाचे चित्र डोळ्यांसमोर व त्यातील अस्सल जिवंतपणा जसाच्या तसा उभा राहतो. कादंबरी वाचकाला अस्वस्थ करते. वाचनात खिळवून ठेवते. समाजातील अपरिचित व अपरिमीत क्रूरतेचे दर्शन घडवते.

कादंबरी वाचकाला ग्रामीण जीवनातील वेदनादायी वास्तववादी संघर्षमय वास्तवाची जाणीवणाचे दर्शन घडवते. समाजातील अतिशय संवेदनशील प्रश्नावर प्रकाश टाकते.हेच लेखकाचे मोठे यश आहे.

एकंदरीत, आपल्या समाजातील आई-बहिणींनी व अनेक स्त्रियांनी सोसलेल्या वेदनांचा जाहीरनामा म्हणून 'अरसड' ही कादंबरी प्रत्येकांनी वाचली जावी अशी आहे. समाजातील विकृत प्रवृत्तींच्या पार्श्वभूमीवर स्त्री आणि कोवळ्या बालमनाची होणारी होरपळ लेखकांनी सूक्ष्म आणि प्रभावी शब्दांत मांडली आहे.व्यंकटेश सोळंके या दमदार लेखकास पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा आणि या कादंबरीचे हार्दिक स्वागत.

**कादंबरी:अरसड**
**लेखक: व्यंकटेश सोळंके**
**प्रकाश: लोकवायय गृह , मुंबई**
**मुखपृष्ठ: मिलिंद कडणे**
**मूल्य :४००/-**
**पृष्ठे : २१८**
**समीक्षण: चंद्रकांत भोपाळकर,नांदेड.**

# नाम जप मुखी....

काय भरवसा । नश्वर देहाचा ।
निरोप जगाचा । घेतो कधी ।।

नाम जप मुखी । घडीभर तरी ।
भायाला अंतरी । ठेवूनिया ।।

संत सेवालाल । बंजारा नायक ।
विकार नाशक । मोतीवाळो ।।

मार वेड्या हाक । ठेवून विश्वास ।
येतो सेवादास । तुजकडे ।।

नको हटू मागे । समाजकार्याला ।
भाया सत्कर्माला । पावणार ।।

सोडायच्या आधी । नश्वर देहाला ।
कळव मनाला । माणुसकी ।।

भावाचा भुकेला । संत सेवालाल ।
भक्तिमार्गे चाल । वेड्या जीवा ।।

सेवालाल नाम । निर्मळ पावन ।
समाज भूषण । सेवालाल ।।

अजू भाया नामें । आयुष्याला कर ।
जिंकून समर । घ्यावयास ।।

**-अजय रमेश चव्हाण**
तरनोळी
ता.दारव्हा, जि.यवतमाळ
मो.८८०५८३६२०७

# शिवबा

माँ जिजाऊंच्या पोटी जन्मले शिवबा
शुर शिपाई होते शिवबा
स्वराज्याची स्थापना करून
गरिबांना न्याय दिला
रयतेचे राजे होते शिवबा
सुभेदाराच्या सुनेचा आदर करून
स्त्री जातीला मान, सन्मान
दिला शिवबाने
म्हणून म्हणतो बहुजनांचे
राजे झाले शिवबा.

**-गंगाधर गायकवाड**
डॉ. आंबेडकरनगर, नांदेड
मो. ९१५६२१६०९२

# वेळ आणि माणसे

माणसे माणसासारखी, आता वागत नाही
अन हल्ली मनासारखी, माणसे भेटत नाही

येत असतात अनेकजण, आयुष्यात आपल्या
पण नेहमीसाठी कुणी, सोबत राहत नाही

हळूहळू डोळ्याआड जातात, काही गोष्टी
पण डोक्यामधून, सहजासहजी निघत नाही

सवय माणसांची असो की असो व्यसनाची
कितीही केला प्रयत्न, लवकर सुटत नाही

मिळाली संधी आयुष्यात, तर करावे सोने
कारण वेळ कुणासाठी, कधी थांबत नाही

विचार करून घ्यावा, निर्णय आयुष्याचा
कारण वेळ असो की माणसे, पुन्हा येत नाही...

**-सुरज पी. दहागावकर**
चंद्रपूर.
मो. ८६९८६९५८४८

# मुलांमध्ये मानसिक समस्यांचा वाढता प्रभाव चिंताजनक

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत मानसिक समस्या वेगाने वाढत आहेत. त्याचा प्रभाव इतका तीव्र आहे की, यापासून ना कोणता देश सुटला आहे, ना कोणतेही राज्य. हे कटू सत्य आहे की, याच्या घातक परिणामांपासून आज ना कोणते गाव सुरक्षित आहे, ना कोणते शहर, ना कोणती गल्लीतली वस्ती. लहान मुले, किशोरवयीन तरुण, वृद्ध, स्त्रिया आणि पुरुषसर्वजण याचे शिकार बनत आहेत. मात्र, आकडेवारी पाहिली तर विशेषत: लहान मुले आणि किशोरवयीन मुलांमध्ये ही समस्या अधिक गंभीर होत चालली आहे.

यामुळे मुलांचे निरागसपण हरवत चालले आहे. त्यांचे फुलासारखे हसणे कुठेतरी हरवले आहे. ते चिडचिडे होत आहेत, लहानशा गोष्टींवरही रागावू लागले आहेत. इतकेच नव्हे, तर काही वेळा ते आपल्या पालकांवर किंवा संरक्षकांवरही हल्ला करण्यास मागेपुढे पाहत नाहीत. त्यामुळे पालकांनाही हे समजत नाही की, काही महिन्यांपूर्वी किंवा वर्षभरापूर्वी ज्या मुलांचा स्वभाव निरागस व आनंदी होता, जे खेळायचे, हसायचे, गाणी गात गाणं गुणगुणायचे आणि वयाला साजेस्या खोडकर शरारती करायचे, त्यांच्यात अचानक एवढा बदल का झाला? असे काय झाले की, ते आता कोणाचेही ऐकायला आणि मानायला तयार नाहीत?

विडंबना म्हणजे, ज्या वयात मुलांनी खेळायला, बागडायला आणि निरोगी आहार घ्यायला हवे, त्या वयातच त्यांच्यात बेचैनी, नैराश्य आणि मानसिक तणाव यांसारख्या समस्या गंभीर स्वरूप धारण करत आहेत. जागतिक आरोग्य संघटना (थक्ज) आणि संयुक्त राष्ट्र बालकोष (णछ्खउएक्र) यांच्या 'मेंटल हेल्थ ऑफ चिल्ड्रन अँड यंग पीपल' या ताज्या अहवालानुसार, संपूर्ण जगात १० ते १९ वयोगटातील दर सातपैकी एक मूल कोणत्या ना कोणत्या मानसिक समस्येने ग्रस्त आहे. या समस्यांमध्ये नैराश्य, चिंता आणि वर्तणुकीशी संबंधित अडचणी यांचा समावेश आहे. अंदाजानुसार, मानसिक आरोग्याशी संबंधित सुमारे एक तृतीयांश समस्या १४ वर्षांपूर्वीच सुरू होतात, तर त्यापैकी अर्ध्या समस्या १८ वर्षांपूर्वीच स्पष्ट होऊ लागतात. याचा अर्थ असा की, जेव्हा लहान मुले बालपणातून किशोरवयाकडे वाटचाल करू लागतात, त्याच काळात मानसिक आरोग्याशी संबंधित वेगवेगळ्या समस्या त्यांना आपल्या विळख्यात ओढू लागतात.



युनिसेफच्या एका अहवालानुसार, भारतात सातपैकी एक मूल नैराश्याचा शिकार आहे. जर आकडेवारी पाहिली, तर देशातील १४% मुलांचे मानसिक आरोग्य खराब आहे. त्याचप्रमाणे, 'इंडियन जर्नल ऑफ सायकिअट्री' मध्ये २०१९ मध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, भारतात ५ कोटींहून अधिक मुले मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांचा सामना करत होती. यापैकी बहुतांश मुले तणाव, चिंता आणि नैराश्याने ग्रस्त होती. युनिसेफच्या अंदाजानुसार, कोरोना महामारीनंतर ही संख्या अनेक पटींनी वाढली आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (थक्ज) अहवालानुसार, संपूर्ण जगभरात ३० कोटींहून अधिक लोक चिंता आणि तणावाशी झगडत आहेत, तर २८ कोटी लोक नैराश्याचा सामना करत आहेत.

विज्ञान पत्रिका 'द लॅन्सेट' मध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, ऑस्ट्रेलियामध्ये ७५% किशोरवयीन मुले तीव्र तणाव, चिंता आणि नैराश्याने ग्रस्त आहेत. तसेच, १० ते १८ वर्षे वयोगटातील ६४% प्रौढांना तीनपेक्षा जास्त वेळा मानसिक आरोग्याच्या समस्यांचा त्रास सहन करावा लागला आहे. तज्ज्ञांचे मत आहे की, किशोरावस्थेदरम्यान हार्मोन्स आणि शारीरिक बदलांमुळे मुला-मुलींच्या विचारसरणी आणि वर्तणुकीत मोठे परिवर्तन घडते. त्याशिवाय, या काळात त्यांना बोर्डाच्या परीक्षा, करिअर आणि विषय निवडीसारख्या मानसिक दबावाच्या आणि द्विधा मनःस्थितीच्या टप्प्यांमधून जावे लागते, ज्यामुळे तणाव, चिंता आणि नैराश्य वाढते.

अशा परिस्थितीत, जर मुलांना घर आणि शाळेत सहकार्यपूर्ण वातावरण मिळाले नाही, तर हा दबाव आणि गोंधळाचा परिणाम तणाव, चिंता आणि नैराश्याच्या रूपात होऊ शकतो. त्याचप्रमाणे, जे विद्यार्थी नियमित अभ्यास करत नाहीत, त्यांना परीक्षा जवळ आल्यावर प्रचंड मानसिक तणाव जाणवतो. मनोचिकित्सकांचे मत आहे की, आजच्या काळातील मुलांमध्ये अपयश पचवण्याची क्षमता कमी होत आहे. कधी कधी ही समस्या आनुवंशिकदेखील असू शकते. त्याशिवाय, दररोजच्या सवयींमध्ये समाविष्ट झालेल्या फास्ट फुड, शीतपेय आणि सोशल मीडियासारखे घटकही नैराश्याचा प्रमुख कारण बनत आहेत. २०२४ मध्ये 'नेशनल लायब्ररी ऑफ मेडिसिन' (छङच्) मध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, अल्ट्रा-प्रोसेस्ड आणि फास्ट फुड खाल्ल्याने तणाव आणि नैराश्याचा धोका अनेक पटींनी वाढतो. विशेषत:, याचा सर्वाधिक फटका प्रौढांना बसतो, कारण फास्ट आणि अल्ट्रा-प्रोसेस्ड फुडचे सर्वात मोठे ग्राहक तेच असतात.

छङच् मध्ये २०२२ मध्ये प्रकाशित अभ्यासानुसार, साखरयुक्त पदार्थ किंवा ड्रिंक्सचे सेवन किशोरवयीन मुलांच्या मानसिक आरोग्यासाठी मोठे संकट निर्माण करत आहे. त्यामुळे, एनर्जी ड्रिंक किंवा कोल्ड ड्रिंकच्या स्वरूपात मिळणारी पेये नैराश्याचे कारण ठरू शकतात. २०२३ मध्ये 'फ्रंटियर्स' विज्ञान पत्रिकेत प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार, जे किशोरवयीन मुले दररोज सात तासांहून अधिक वेळ स्क्रीनवर घालवतात, त्यांना नैराश्याचा धोका इतरांच्या तुलनेत दुपटीहून अधिक असतो. या अभ्यासानुसार, जर एखादी व्यक्ती दररोज एक तास सोशल मीडियावर घालवत असेल, तर त्यामध्ये नैराश्याची लक्षणे दरवर्षी ४० टक्क्यांनी वाढण्याची शक्यता असते.

'बीएमसी मेडिसिन' मध्ये २०१० मध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, जे मुले खेळ, शारीरिक व्यायाम यामध्ये सहभागी होत नाहीत, त्यांना नैराश्याचा धोका जास्त असतो. या अभ्यासात हे देखील स्पष्ट झाले आहे की, दररोज फक्त एक तास शारीरिक व्यायाम केल्याने नैराश्य आणि तणावाचा धोका ९५ टक्क्यांपर्यंत कमी होतो. त्यामुळे, मुलांचा खेळाचा वेळ वाढवणे आणि 'स्क्रीन टाइम' कमी करण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करणे गरजेचे आहे. परंतु, जे मुले आधीच तणाव आणि नैराश्याचा सामना करत आहेत, त्यांच्या पुनर्वसनासाठी तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

मुलांना व्यावहारिक बनवणे, त्यांना जीवनातील सत्य परिस्थितींशी ओळख करून देणे आणि जीवनातील चढ-उतार समजावून सांगणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण मानसिक विकास हा अनुभव आणि वास्तव जीवनाशी निगडीत असतो. याशिवाय, कुटुंबाने दररोज किमान एक वेळ एकत्र जेवण करणे आवश्यक आहे. या वेळी मोबाइल, टीव्ही किंवा अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणांपासून दूर राहणे हितकारक ठरेल, कारण यामुळे कुटुंबातील सुसंवाद आणि आपुलकी वाढते. 'मरडोक चिल्ड्रेन रिसर्च इन्स्टिट्यूट' या प्रसिद्ध संशोधन संस्थेच्या अभ्यासानुसार, या समस्यांवर केवळ वैद्यकीय उपचारांपेक्षा, मुलांना मानसिक आजारांपासून वाचवण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची अधिक गरज आहे. त्याचप्रमाणे, 'डब्ल्यूएचओ' आणि 'युनिसेफ' यांच्या 'मेंटल हेल्थ ऑफ चिल्ड्रेन अँड यंग पीपल' या अहवालात, मुलांचे मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी 'समुदाय आधारित मॉडेल' विकसित करण्यावर भर दिला आहे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे**
जत, जि.सांगली

# पोलीस पाटलांनी गाव पातळीवर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने सतर्क असावे -पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप



**मुदखेड (प्रतिनिधी)–** पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये कायदा, सुव्यवस्था व शांतता कायम ठेवण्याकरिता पोलीस पाटलांनी पोलीस ठाण्याशी समन्वय साधून सतर्क असावे, असे आवाहन पोलीस ठाण्याच्या वार्षिक तपासणी दरम्यान नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले. त्यांनी पोलीस ठाण्याच्या वार्षिक तपासणी दरम्यान पोलीस पाटील व तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष यांच्याशी संवाद साधला. याप्रसंगी ते बोलत होते.

यानिमित्ताने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या संकल्पनेतून शहर सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे संगणक प्रणालीद्वारे उद्घाटनही त्यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्यासह इतर पोलीस अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

या भेटीदरम्यान विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचा संजय कोलते यांनी सत्कार केला. वार्षिक तपासणी दरम्यान वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्या अंतर्गत विविध गुन्हे, इतर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्यामार्फत माहिती जाणून घेतली आणि त्यावर उपाययोजना करण्याच्या सूचना अधिनस्त पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना दिल्या. त्याचप्रमाणे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावपातळीवरील कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने इतर माहिती देखील पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस पाटील आणि तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष यांच्यामार्फत जाणून घेतली. पोलीस ठाण्याच्या हद्दीत शासनाच्या कुठल्याही पूर्वपरवानगीशिवाय कोणतेही पुतळे बसणार नाहीत याविषयी पोलीस पाटलांनी दक्षता घ्यावी व ग्रामीण भागात बिबट्याच्या मुक्त संचाराविषयी वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविण्यात येईल, असेही उमाप यांनी स्पष्ट केले.

# कुसुम महोत्सवातून बचत गटांना व्यासपीठ उपलब्ध -खा. अशोकराव चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी)–** 'व्होकल फॉर लोकल'चा संदेश देत स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देण्याच्या दिशेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आत्मनिर्भर भारताची हाक दिली आहे. या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत कुसुम महोत्सवाच्या माध्यमातून स्थानिक उत्पादक आणि महिला बचत गटांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले आहे. या उपक्रमातून महिलांचे सक्षमीकरण होत असून, नांदेडच्या विकासाला नवी दिशा मिळत असल्याचे प्रतिपादन राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांनी केले.

नांदेड शहरातील यशवंत महाविद्यालयाच्या प्रांगणात डॉ. शंकरराव चव्हाण व कै. सौ. कुसुमताई चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित कुसुम महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यात अध्यक्षीय समारोप करताना खा. चव्हाण बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार अमितादाई चव्हाण, माजी मंत्री डी. पी. सावंत, भाजपा महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर, आमदार श्रीजया चव्हाण, कार्यक्रमाच्या अध्यक्षा महापौर कविता मुळे, आयुक्त महेश डोईफोडे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मीनल पाटील खतगावकर, स्थायी समितीचे माजी सभापती किशोर स्वामी, मंगलाताई निमकर, मृणालताई राजूरकर, मोहिनी येवनकर, शैलजा स्वामी, रंजना सावंत, सुजया चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना खा. अशोकराव चव्हाण म्हणाले की, नांदेडकरांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळेच शंकर दरबार असो किंवा कुसुम महोत्सव, प्रत्येक उपक्रम यशस्वी होत आहे. महिला बचत गट व स्थानिक उत्पादकांना या सोहळ्यात थेट ग्राहकांशी जोडण्याची संधी मिळते. 'व्होकल फॉर लोकल'चे महत्त्व विशद करत त्यांनी सांगितले की, स्वावलंबी भारताच्या उभारणीत विकसित महाराष्ट्र आणि विकसित मराठवाड्यासोबत विकसित नांदेड घडविण्याचा संकल्प आहे. यंदाच्या महोत्सवाला झालेली प्रचंड गर्दी हीच या उपक्रमाच्या यशाची पावती असल्याचे ते म्हणाले. भविष्यातही कुसुम महोत्सवाच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी आमदार श्रीजया चव्हाण यांनी आपल्या मनोगतात महिलांच्या आर्थिक प्रगतीसाठी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. मी महिला आमदार असल्याने महिला सक्षमीकरण ही माझी प्राथमिक जबाबदारी आहे. कुसुम महोत्सवाच्या माध्यमातून स्थानिक बचत गटांना, लघुउद्योजकांना मोठे व्यासपीठ मिळते. येथे सांस्कृतिक मेजवाणीबरोबरच शॉपिंग आणि फूड फेस्टिव्हलमुळे सर्वांगीण वातावरण निर्माण होते, असे त्या म्हणाल्या. भोकर मतदारसंघातील रेणापूर या छोट्या गावातील एका महिलेने आवळा कॅन्डीच्या व्यवसायातून देश-विदेशात आपली ओळख निर्माण केली असून, तिची वार्षिक उलाढाल २५ ते ३० लाखांपर्यंत पोहोचली आहे, असे उदाहरण देत महिलांच्या जिद्दीचा गौरव त्यांनी केला. पुढेही महिलांच्या प्रगतीसाठी ठोस प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी महापौर कविता मुळे यांनी डॉ. शंकरराव चव्हाण आणि खा. अशोकराव चव्हाण यांचे नांदेडकरांवरील प्रेम अधोरेखित केले. सिंचन, शिक्षण आणि विविध विकासकामांत त्यांनी नेहमी पुढाकार घेतला. समाजसेवेचा हाच वारसा आमदार श्रीजया चव्हाण समर्थपणे पुढे नेत आहेत, असे त्या म्हणाल्या.

# दहावीचा इंग्रजीचा पेपर जिल्ह्यातील सर्व १७८ केंद्रांवर सुरळीत -जिल्हाधिकारी कर्डिले

**नांदेड (प्रतिनिधी)–** इयत्ता १० वीची परीक्षा जिल्ह्यातील १७८ केंद्रांवर सुरळीत पार पडत असून, इंग्रजी विषयाच्या पेपरसाठी एकूण ४८,८३२ परीक्षार्थ्यांपैकी ४७,७२५ परीक्षार्थी उपस्थित होते. उपस्थितीची टक्केवारी ९७.७३ इतकी नोंदविण्यात आली.

प्रत्येक केंद्रावर बैठे पथकांमार्फत झुमवेबकास्टद्वारे तसेच ड्रोन आणि व्हीडीओ कॅमेराच्या सहाय्याने पूर्णवेळ नियंत्रण ठेवण्यात आले. त्यामुळे सर्व १७८ परीक्षा केंद्रांवर परीक्षा सुरळीत व कॉपीमुक्त वातावरणात पार पडली.

आजच्या इंग्रजीच्या पेपरसाठी जिल्हास्तरावरील सुमारे ६६ अधिकारी ६६ परीक्षा केंद्रांवर पूर्णवेळ उपस्थित होते. तसेच शिक्षण विभागाचे ७ अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख व तालुकास्तरावरील अधिकारी अशा एकूण ११२ अधिकाऱ्यांनी भरारी पथकांमार्फत सर्व १७८ केंद्रांना भेट देऊन उपस्थिती नोंदविली. त्यामुळे परीक्षा प्रक्रिया काटेकोरपणे राबविण्यात आली.

दरम्यान, जिल्हा परिषद हायस्कूल, बेटमोगरा ता. मुखेड येथील केंद्रावर एका परीक्षार्थ्याच्या जागी तोतया परीक्षार्थी उपस्थित असल्याचे भरारी पथक प्रमुख जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे यांच्या निदर्शनास आले. संबंधिताविरुद्ध मंडळ नियमावली तसेच भारतीय न्यायसंहिता कलम १६३ आणि महाराष्ट्र गैरप्रकार अधिनियम १९८२ अन्वये कारवाई करण्यात येत आहे.

इयत्ता १० वी व १२ वीच्या सर्व परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. यासाठी विद्यार्थी व पालकांनी सकारात्मक सहकार्य करावे. तसेच यापुढील सर्व परीक्षांमध्ये तोतया परीक्षार्थी आढळू नयेत यासाठी परीक्षा प्रक्रियेशी संबंधित सर्व घटकांनी विशेष दक्षता घ्यावी आणि प्रत्येक परीक्षार्थ्याची ओळख पडताळूनच परीक्षा दालनात प्रवेश द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

# कलेच्या माध्यमातून राष्ट्रीयता जपण्याचे संस्कार भारतीचे मोठे कार्य -डॉ. मैसूर मंजुनाथ



**नांदेड (प्रतिनिधी)–** देशाची संस्कृती, संस्कार, धर्म, कला जपण्याचे कार्य कलेच्या माध्यमातून संस्कार भारती देशभर करीत असल्याचे प्रतिपादन संस्कार भारतीचे अ. भा. अध्यक्ष तथा ख्यातनाम व्हायोलिन वादक डॉ. मैसूर मंजुनाथ यांनी केले.

शहरात आयोजित संस्कार भारतीच्या देवगिरी प्रांताच्या कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते. या बैठकीस देवगिरी प्रांताचे मराठवाडा, खानदेश येथील समिती पदाधिकारी तसेच शहरातील प्रतिष्ठित नागरिक कलावंत कलाप्रेमी उपस्थित होते.

याप्रसंगी व्यासपीठावर संस्कार भारती देवगिरी प्रांताच्या अध्यक्षा स्नेहलताई पाठक, कार्याध्यक्ष भगवानराव देशमुख, महामंत्री डॉ. जगदीश देशमुख, जिल्हाध्यक्ष राधिकाताई वाळवेकर उपस्थित होते. ख्यातनाम व्हायोलिन वादक नागराज मैसूर, मृदंगम वादक अर्जुनजी यांचीही विशेष उपस्थिती होती.

यावेळी बोलताना मंजुनाथ म्हणाले की, कलाकार होणे एवढे सोपे काम नाही, त्यामुळेच समाजामध्ये कलाकारांना वेगळी प्रतिष्ठा आहे. देशाची संस्कृती, धर्म, संस्कार याचा विचार करणे हे अत्यंत महत्त्वाचे असून यालाच प्राधान्य देऊन संस्कार भारतीची देशभर कलेच्या माध्यमातून देशसेवा सुरू आहे. देशातील मोठमोठे कलावंत संस्कार भारतीशी जोडले गेले असून देशांमध्ये सुमारे १ हजार चारशे शाखा आहेत. संघाची पाळेमुळे ही महाराष्ट्रातच रोवली गेली असून कलावंतांसाठी महाराष्ट्राची भूमी ही खरोखरच चांगली असल्याचे सांगून देवगिरी प्रांताच्या कार्याचा त्यांनी गौरव केला.

स्नेहलताताई पाठक यांनी संस्कार भारतीच्या माध्यमातून कलावंतांना समोर आणण्याचा आणि त्यांना व्यासपीठ निर्माण करून देण्याचा प्रयत्न असल्याचे सांगत देवगिरी प्रांतात झालेल्या कार्याची माहिती दिली. डॉ. जगदीश देशमुख यांनी संस्कार भारतीच्या विविध अंगांना स्पर्श करीत देवगिरी प्रांताच्या विस्ताराबाबत माहिती देऊन कार्यक्रम आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला तर अध्यक्षा राधिकाताई वाळवेकर यांनी जिल्हास्तरावर घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी पुरस्कार प्राप्त व ज्येष्ठ कलावंत तसेच मान्यवरांचा विशेष सत्कार करण्यात आला. संस्कार भारती ध्येयगीत आणि वंदे मातरम गायन सौ. अंजली दीक्षित यांनी केले त्यास तबला साथ भार्गव देशमुख यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी व मराठी या दोन्ही भाषेत प्रा. डॉ. वैशाली गोस्वामी कुलकर्णी यांनी तर आभार रश्मी वडवळकर यांनी मानले.

ज्येष्ठ संगीत गुरु सीताभाभी राव, सुरमणी धनंजय जोशी, संजय जोशी, डॉ.गुंजन शिरभाते, सुधाताई नरवाडकर, आशाताई पैठणे,प्रा.विलास वैद्य, धर्मभूषण दिलीप ठाकूर, छायाचित्रकार विजय होकर्णे, नगरसेविका ॲड. शांभवी साले आदींचा यावेळी सत्कार करण्यात आला.

# श्री दत्तप्रभू शाळेत मराठी भाषा दिन उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** श्री दत्तप्रभू प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेत मराठी भाषा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

महान कवी विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव धर्माधिकारी हे होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक महेश धर्माधिकारी यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी मराठी भाषा दिनाचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. बी. सावंत यांनी केले, तर आभार नागरगोजे पी. जी. यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स. शि. सौ. आगलावे आर. पी., सौ. हिवराळे एस. डी., सौ. पापुलवार एस. एन., गायकवाड ए. एस., काळे जी. एस. यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास परिसरातील पालक, नागरिक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विज्ञानवादी विचारांचे संत सेवालाल महाराज -कैलास राठोड

**नांदेड (प्रतिनिधी)–** संत सेवालाल महाराज महाराष्ट्रातील संत परंपरेतील श्रेष्ठ संत होते, असे प्रतिपादन कैलास राठोड यांनी केले. ते प्रतिभा निकेतन महाविद्यालय नांदेड येथे संत सेवालाल महाराज यांच्या १८२ व्या जयंतीनिमित्त प्राचार्य डॉ. किशोर गंगाखेडकर यांच्या मार्गदर्शनाने आयोजित प्रतिभा व्याख्यानमालेचे २४ वे पुष्प गुंफताना बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. श्रीमंत राऊत होते.




पुढे बोलताना राठोड म्हणाले, संत विशिष्ट जातीचे नसतात. ते मानव समाजाचे असतात. जाती न पुछीए साधू की पुछ लिजिए ज्ञान, मोल करो तलवार का पड़ी रहनें दो म्यान, या दोह्याप्रमाणे संतांच्या ज्ञानाला महत्त्व देणे आवश्यक आहे. सेवालाल महाराज यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला.

ते म्हणाले की, सेवालाल महाराज यांना समाजातील सर्व लोक त्यांना मोठा भाऊ संबोधित. सेवालाल महाराज यांनी आजीवन ब्रह्मचारी राहून समाज सेवा करण्याचे वृत्त स्वीकारले. सेवालाल महाराज यांनी कष्टकरी मालवाहतूक करणाऱ्या बंजारा समाजातील लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. सेवालाल महाराज यांचे विचार प्रासंगिक आहेत. सतराव्या शतकात त्यांनी पर्यावरण संरक्षण करण्याचे उपदेश देताना झाडे लावा, जंगलाचे रक्षण करा, अंधश्रद्धेला बळी पडून प्राण्यांचे बळी देऊ नका, असा मुलमंत्र दिला.

पोहरागड येथे जगदंबा देवी मंदिराच्या बाजूला सेवालाल महाराज यांची समाधी आहे. आज मोठ्या संख्येने तेथे लोक नतमस्तक होतात. पाणी विकणे पाप आहे, चोरी करून खोटे बोलून धनसंचय करू नका, असा मौल्यवान उपदेश त्यांनी केला. प्रसंगी बंजारा लोकगीतांच्या माध्यमातून बंजारा संस्कृतीचा आढावा घेतला.

यावेळी कार्यक्रमास महाविद्यालयातील बहुसंख्य प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्वाती तांडे यांनी केले तर आभार श्रीनिवास जोशी यांनी मानले.

# डी. के. पाटील महाविद्यालयात मराठी भाषा गौरवदिन उत्साहात साजरा

**लोहा (प्रतिनिधी)** –डी. के. पाटील महाविद्यालयात मराठी भाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. त्यामुळे या वर्षी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्याचा आनंद द्विगुणित झाला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. साक्षी धुतमल यांनी केले. प्रा. एस. एम. आंबोरे यांनी महाराष्ट्राच्या साहित्य क्षेत्रात अर्थात सांस्कृतिक क्षेत्रामध्ये कुसुमाग्रज यांचे योगदान काय आहे व ते नेहमीच मोलाचे आहे असे सांगितले. तसेच शेवटी ना अंदाज कुठले ना अवधान काही, कुठे जायचे याचे भान नाही, जसा गंध निघतो. हवेच्या प्रवासाना कुठले नकाशे ना अनुमान काही या चारोळ्यांनी मत व्यक्त केले. त्यानंतर प्रा. जे. ए. वाघमारे यांनी मराठी भाषेचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.

यावेळी उपस्थितांचे आभार प्रा. अश्विनी गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. अजय क्षीरसागर, विभाग प्रमुख प्रा. प्रज्ञा भोसले, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**पान १ वरून...**

**हमीभावाने चणा खरेदीसाठी...**

सह.संस्था (शेळगाव थडी) ता. धर्माबाद, अष्टविनायक शेतीमाल खरेदी विक्री सह. संस्था मानवाडी फाटा (ता. हदगाव), महात्मा बसवेश्वर ग्रामीण विकास मंडळ बापशेटवाडी (मुक्रामाबाद) ता.मुखेड, राधामाई फार्मर प्रोडयुसर कंपनी रातोळी ता.नायगाव, पांडुरंग फळे व भाजीपाला सहकारी संस्था धामनगाव ता.मुखेड, बळीराजा पणन अभिनव सहकारी संस्था कोठारी ता.किनवट, श्रीराम जाणकी अभिनव शिक्षण प्रसारक मंडळ सगरोळी ता. बिलोली, चक्रधर फळे व भाजीपाला सहकारी संस्था बिल्लाळी ता.मुखेड, स्वामी विवेकानंद अभिनव नाविन्यपुर्ण सहकारी संस्था चाकुर ता.देगलूर, स्व. प्रमोद महाजन अभिनव नाविन्यपुर्ण सहकारी संस्था पाळा ता. मुखेड, जगदंबा विद्या प्रसारक मंडळ बाऱ्हाळी ता. मुखेड, सिद्राम फार्मर प्रोडयुसर कंपनी बेटमोगरा ता.मुखेड या ठिकाणी मार्केटिंग फेडरेशनमार्फत चणा खरेदीसाठी ऑनलाईन शेतकरी नोंदणी सुरु होणार आहे. सदरील नोंदणी ही ऑनलाईन पध्दतीने पीओएस मशीनद्वारे करण्यात येणार असल्याने नोंदणीकरीता प्रत्यक्ष खरेदी केंद्रावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे. जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी हमीभाव योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नांदेडचे जिल्हा पणन अधिकारी राजेश गव्हाणे यांनी केले आहे.

-----------------

**पोलीस उपमहानिरीक्षक उमाप...**

अभिलेख ते पोलिसांना दाखवू शकले नाहीत.

सदर जुगार अड्ड्यावर, देशी दारू आणि इतर तंबाखूजन्य पदार्थ देखील मिळून आल्याने, संबंधितांविरुद्ध कलम ४, ५ मुंबई जुगार कायदा, कलम ६५ (इ) मुंबई दारूबंदी अधिनियम व कलम ६ (ब) व २४, सिगारेट आणि इतर तंबाखूजन्य उत्पादने कायदा, २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास ताडकळस पोलीस ठाण्याचे, पोलीस उपनिरीक्षक सतीश तावडे हे करत आहेत.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/संजीव जिंकलवाड, पोकॉ/ गणेश धुमाळ व पोकॉ/ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

# मागासवर्गीयांसाठी व्यवसाय अनुदान योजना; १० मार्चपर्यत अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत समाज कल्याण विभागामार्फत मागासवर्गीय बांधवांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये जिल्हा परिषद २० टक्के सेस अंतर्गत खालील अर्थसहाय्याच्या योजना कार्यान्वित आहेत.

मागासवर्गीयांना व्यवसायासाठी अनुदान, मागासवर्गीय महिलांना व्यवसायासाठी अनुदान, प्रती लाभार्थी कमाल ४० हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. प्रत्यक्ष खर्च कमी झाल्यास पावतीनुसार अनुदान देय राहील.

योजना ग्रामीण भागातील (अ.जा./अ.ज./विजाभज) प्रवर्गातील पुरुष व महिलांसाठी स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी आहे. लाभार्थी ग्रामीण भागातील असावा. वय १८ ते ५० वर्षे दरम्यान असावे. वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. सक्षम प्राधिकाऱ्यांनी निर्गमित केलेले मूळ जात प्रमाणपत्र आवश्यक आहे. रहिवासी प्रमाणपत्र बंधनकारक आहे. उद्योगासाठी ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. व्यवसायासाठी स्वतःची जागा असावी. भाड्याची जागा असल्यास भाडेकरार व पावती आवश्यक. अंतिम निवडीचे अधिकार विषय समिती/प्रशासनाकडे राहतील. लाभार्थ्याने जिल्हा परिषदेच्या इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. व्यवसाय सुरू केल्याचे प्रमाणपत्र ग्रामसेवक/ग्रामपंचायत अधिकारी/विस्तार अधिकारी (पंचायत समिती) यांचेकडून घेणे आवश्यक राहील.

# बाऱ्हाळीत जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्रचार्य यांच्या पादुका दर्शन सोहळा संपन्न

**बाऱ्हाळी (प्रतिनिधी)–** बाऱ्हाळी येथे जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी संस्थान नानिजच्या अंधश्रद्धा निर्मूलन उपक्रमांतर्गत जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्रचार्य यांच्या पादुका मिरवणूक, पादुका दर्शन सोहळा, उपासक दीक्षा, पुष्पवृष्टी, गुरूपूजन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी येथे मंगळवार, दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या सिद्ध पादुकांची मुख्य रस्त्यावरून विविध देखावे, टाळ मृदंगाच्या घोषात भव्य मिरवणूक काढण्यात आली. भक्तांना भव्य मिरवणूक आणि गुरुपूजन पालखी सोहळा, अध्यात्म, भक्ती आणि परंपरेचा सुंदर संगम अनुभवयास मिळाला.

यावेळी दुर्बल घटक उपक्रमांतर्गत गरजू कुटुंबांना घरघंटी पिठाची गिरणीचे वाटप प्रमुख अतिथी गंगाधर राठोड, राजन देशपांडे (सरपंच प्र.), काकासाहेब वनारसे (पीठ प्रमुख, उपपीठ तेलंगणा), शेषराव चव्हाण, डॉ. श्रावण रॅपनवाड, मल्हारराव देशपांडे, श्रीमती विजयाताई देशपांडे, खुशालराव पाटील उमरदरीकर, शेखर देशमुख, बालाजी पाटील सकनूरकर, साहेबराव देशमुख यांच्या उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते मोफत वाटप करण्यात आले. नाणीजधाम येथील ज.न.म. प्रवचनकार विपीन नेवासकर यांचे सुंदर अमृतमय प्रवचन झाले तर भक्तांनी जय सियाराम, जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी की जयच्या जयघोषांनी अख्खा परिसर दुमदुमून टाकला.

सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी उसळल्याचे चित्र यावेळी दिसून आले. पादुका दर्शन सोहळ्यास उदगीर, जळकोट, मुखेड, देगलूर, बिलोली आधी परिसरातील जवळपास तीस हजार भाविक उपस्थित होते. पारंपरिक ढोल-ताशे, टाळ-मृदंग, भजन-कीर्तन व लेझीमच्या तालात पादुकांची मिरवणूक काढण्यात आली.

या सोहळ्यात महिला, बालके, युवक, ग्रामस्थ आणि विविध सामाजिक संघटनांनी उत्स्फूर्त असा सहभाग घेतला. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनातर्फे चोख बंदोबस्त लावण्यात आला होता.

# चंदेरी

# एआय संपूर्ण पिढी नष्ट करू शकते!

## विशेष मुलाखतीत दिया मिर्झाने व्यक्त केली भीती



**दिया मिर्झा केवळ देशातच नव्हे तर जागतिक व्यासपीठांवर पर्यावरण संरक्षणाच्या मुद्द्यांवर आवाज उठवत आहे. अलीकडेच तिने विशेष मुलाखत दिली. मुलाखतीदरम्यान दियाने खुलासा केला, की तिने तिच्या मुलांना समायरा आणि अव्यानला पर्यावरण संरक्षण शिकवलेच नाही तर ते करूनही दाखवले आहे. तिचा ५ वर्षांचा मुलगादेखील सिंगल युझ प्लास्टिक का वापरू नये हे पूर्णपणे समजतो. ती आजच्या जनरेशन झेड पिढीला भावनिक, तरीही बुद्धिमान मानते. 'रहना है तेरे दिल में' फेम अभिनेत्री कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) धोक्यांविरुद्धदेखील इशारा देते. हैदराबादमध्ये जन्मलेली ४४ वर्षीय अभिनेत्री असा युक्तिवाद करते की एआय संपूर्ण पिढीची विचारसरणी खराब करू शकते. तिची पूर्ण मुलाखत वाचा...**

» माझी निवड अन् कृती त्याला बरेच काही शिकवते... : दियाला विचारले गेले की ती मुलांना निसर्गावर प्रेम करायला कशी शिकवते? तिने उत्तर दिले, की मी माझ्या मुलाला काहीही शिकवत नाही. माझ्या निवडी आणि माझ्या कृती त्याला सांगतात की त्याने काय निवडावे आणि त्याच्यासाठी काय योग्य आहे. त्याला माहीत आहे की आमच्या घरातील सर्व कचरा कंपोस्ट करून वापरला जातो. त्याला माहीत आहे की जर काही तुटले तर ते दुरुस्त करता येते. खाल्ल्यानंतर तो देवाचे आणि शेतकऱ्याचे आभार मानतो. इतकेच नाही तर तो त्याचे अन्न शिजवणाऱ्या व्यक्तीचेही आभार मानतो. म्हणून, तो हे सर्व समजतो.

» जेन झेड खूप भावनिक अन् बुद्धिमान पिढी... : आजकाल जेन झेडबद्दल खूप चर्चा आहे. काही लोक या पिढीचे वर्णन बुद्धिमान म्हणून करतात, तर काहीजण त्यांना मिलेनियल्सच्या तुलनेत कमकुवत म्हणतात. दिया मिर्झा या पिढीबद्दल काय विचार करते? ती क्षणभर हसते, आणि म्हणते, जेन झेड ही पिढी खूप मनोरंजक आहे, खूप भावनिक आहे आणि ते त्यांच्या भावनांचे समर्थन करण्यास तत्पर आहेत, जी एक उत्तम गोष्ट आहे. कारण मानसिक आरोग्य आणि भावनांबद्दल त्यांची समज आपल्यापेक्षा चांगली आहे. पण असेही जेन झे आहेत ज्यांना शॉर्टकट हवे आहेत, सर्वकाही लवकर हवे आहे आणि जास्त प्रयत्न न करणाऱ्या गोष्टी करण्याचा आग्रह धरतात. त्यांच्याकडे कोणत्याही गोष्टीसाठी धीर नाही.

» एआय संपूर्ण पिढी नष्ट करू शकते : आजकाल एआयबद्दल खूप चर्चा आहे. एआय पर्यावरण संरक्षणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते का? याबद्दल ती म्हणते, की मला वाटते की जर जबाबदारीने वापरले तर एआय सामाजिक परिणामांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते. कारण आपण पाहत आहोत की एआयचा वापर किती बेजबाबदारपणे केला जात आहे. एआय संपूर्ण पिढी कशी नष्ट करू शकते याबद्दल मला देखील चिंता आहे. मुले तुम्ही आणि मी ज्या पद्धतीने वापरतो त्याप्रमाणे ते वापरत नाहीत. एआय प्रत्येक उत्तर, प्रत्येक गोष्ट एका क्षणात तयार करते. तर, ते स्वतःच्या मेंदूने काहीही कसे शिकू शकतात? ते स्वतःसाठी विचार करण्याची क्षमता गमावू शकतात.

» एआयचा आपल्या पर्यावरणावर गंभीर परिणाम : दिया मिर्झा म्हणाली, की एआयचा आपल्या पर्यावरणावरही परिणाम होईल. एआय स्टोरेज सर्व्हर इतके पाणी वापरतात. आधीच पाण्याच्या टंचाईशी झुंजत असलेल्या देशात, जर आपण एआय हब आणि सर्व्हर बांधण्याचा विचार करत असू, तर हे सर्व करण्यासाठी पाणी कुठून येईल? ही गंभीर चिंतेची बाब आहे. माझा असा विश्वास आहे की जर आपण स्वच्छ पाणी, स्वच्छ हवा आणि निरोगी अन्न देऊ शकत नसलो तर आपण या क्षेत्रात पुढे जाऊ नये.

» एआयने तयार केलेला फोटो पाहिल्यावर मी घाबरले... : दिया मिर्झा एआयच्या धोक्यांबद्दल एक वैयक्तिक घटना देखील शेअर करते. ती म्हणते, की कोणीतरी मला माझे असे फोटो पाठवले जे मी कधीही पाहिले नाहीत, जे माझ्यासोबत कधीही काढले गेले नाहीत. त्यांनी मुळात माझा चेहरा दुसऱ्याच्या शरीरावर लावला. त्यांनी एक संपूर्ण प्रतिमा तयार केली. ते पाहून मी घाबरले. हे खूप धोकादायक आहे. आपल्याला याबद्दल कायदे करण्याची गरज आहे, असे कायदे जे आपल्या गोपनीयतेचे आणि आपल्या ओळखीचे एआयपासून संरक्षण करतात. कारण एआय काहीही करू शकते, आपला आवाज, आपला आकार आणि आपली संपूर्ण ओळख चोरू शकते. म्हणून ही एक मोठी समस्या आहे.

## चित्रपट निर्माते अनुभव सिन्हा यांची विशेष मुलाखत

# स्त्री असणे खूप कठीण, मला ते दु:ख जाणवले...



**बॉलिवूडमध्ये जवळजवळ अडीच दशके घालवलेले चित्रपट निर्माते अनुभव सिन्हा यांनी 'तुम बिन' या रोमँटिक चित्रपटाने आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली होती. त्यांनी 'रा. वन' हा ॲक्शनने भरलेला सुपरहिरो चित्रपटही बनवला आहे. तथापि, 'मुल्क', 'आर्टिकल १५' आणि 'थप्पड'सारख्या चित्रपटांनंतर तो अर्थपूर्ण आणि सामाजिकदृष्ट्या संबंधित चित्रपटांचा निर्माताही बनला आहे. आता तो 'अस्सी' चित्रपट घेऊन आला आहे. हा चित्रपट गेल्या २० फेब्रुवारीला थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटाने प्रामुख्याने लक्ष वेधले आहे. कारण आजच्या काळात लेखकाला कलाकारांपेक्षा जास्त पैसे दिले जातात. दुसरे म्हणजे हा एक चित्रपट आहे जो बलात्कारासारख्या गुन्ह्यांना सामान्य करण्याच्या मुद्द्यावर तीव्र हल्ला करतो. तुम्ही हा चित्रपट पाहता तेव्हा प्रत्येक मिनिटाला तुम्हाला त्यातील पात्रांना भेडसावणाऱ्या वेदना अनुभवता. खास मुलाखतीत अनुभव सिन्हा यांनी 'अस्सी' चित्रपट निर्माता म्हणून त्यांचा प्रवास आणि समाजातील महिलांचे महत्त्व याबद्दल उघडपणे सांगितले.**

अनुभव सिन्हा हा अशा चित्रपट निर्मात्यांपैकी एक आहे ज्यांना अर्थपूर्ण चित्रपटाचा चेहरा म्हटले जाते. सिन्हा म्हणतात, की अर्थपूर्ण सिनेमाचा चेहरा हा टॅग मी दुर्लक्षित करतो. कारण माझी कारकीर्द खूपच गतिमान राहिली आहे. तापसी पन्नूचे कौतुक करताना ते म्हणतात, की तापसी ही एक अतिशय सहज अभिनेत्री आहे. ती तिच्या दिग्दर्शकाचे खूप काळजीपूर्वक ऐकते आणि त्याला अनुभवते. ती खूप अंतर्ज्ञानी देखील आहे, म्हणूनच ती एक अद्वितीय अभिनेत्री आहे...

### 25 व्या वर्षी चित्रपट निर्माते होण्याचा विचार

अनुभव सिन्हा सांगतात, की मी माझ्या कारकिर्दीची सुरुवात 'तुम बिन' या प्रेमकथेने केली, नंतर दस हा ॲक्शन चित्रपट बनवला. त्यानंतर मी एक सुपरहिरो चित्रपट बनवला आणि नंतर मी सामाजिक-राजकीय चित्रपटांकडे आकर्षित झालो. कदाचित उद्या मी काहीतरी वेगळे बनवेल. पहा लहानपणी मला माहितही नव्हते की मी चित्रपट निर्माता होईन. वयाच्या २५ व्या वर्षी मला समजले की मला चित्रपट निर्माते व्हायचे आहे. माझा एक प्रवास होता जिथे चित्रपट निर्मिती ही माझी कारकीर्द होती, परंतु 'मुल्क' सारख्या चित्रपटाने माझ्या कारकिर्दीचा मार्ग मोठ्या प्रमाणात बदलला. 'मुल्क' चा आवाज लोकांपर्यंत ज्या प्रकारे पोहोचला त्यामुळे मी या शैलीकडे आकर्षित झालो. माझी कारकीर्द प्रत्येक शैलीत ५-६ वर्षे पसरली आहे, परंतु मी सामाजिक-राजकीय शैलीत सर्वात जास्त काळ टिकलो आहे. हा प्रवास दहा वर्षांपासून सुरू आहे. माझा कम्फर्ट झोन येथे सर्वात मोठा आहे.

### मुलांशी संवाद साधला पाहिजे...

मुलांच्या गटाने एका मुलीवर बलात्कार केल्याच्या अलिकडच्या बातमीने लोकांना हादरवून टाकले. यावर ते म्हणतात, ही अशी मुले आहेत ज्यांना कदाचित शारीरिक जवळीकतेचा खरा अर्थही माहीत नसेल. मला वाटते की आपण आपल्या मुलांशी काही संभाषणे चुकवत आहोत. आपण त्यांच्याशी अधिक बोलले पाहिजे. त्यांना पुरुष असण्याचा फरक समजून सांगितला पाहिजेत. त्यांना त्यांच्या हक्कांच्या आणि इच्छांच्या मर्यादा सांगितल्या पाहिजेत. कारण जेव्हा ते मर्यादा ओलांडतात तेव्हाच गुन्हेगारी सुरू होते.

### पुरुषाला स्त्रीच्या भावना अनुभवणे कठीण...

'अस्सी' चित्रपटाबद्दल अनुभव म्हणाले, की मी या चित्रपटात मानसिकदृष्ट्या खूप गुंतवणूक केली आहे. पुरुषाला स्त्रीच्या भावना अनुभवणे खूप कठीण आहे. आपल्याकडे ते प्रशिक्षण नाही. स्त्री असणे खूप कठीण आहे. किती विडंबन आहे की आपण जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणे ज्या व्यक्तीला आपल्या जीवनात सर्वात महत्वाचे मानतो तिचा वापर केला आहे. मग ती आई असो, बहीण असो किंवा पत्नी असो. मी माझ्या मित्रांना सांगतो की रस्त्यावरून स्त्री म्हणून चालण्याचा प्रयत्न करा. ते पूर्णपणे वेगळे जग आहे. मुलीला लहानपणापासूनच सांगितले जाते की ती वेगळी आहे. ती मुक्त होऊ शकत नाही. महिलांच्या सुरक्षिततेबद्दल सतत चर्चा होते, तरीही आपण एक समाज म्हणून अपयशी ठरतो. आपल्याला कोणापासून सुरक्षित राहावे लागेल? शोकांतिका पहा. तुम्हाला स्वतःपासून सुरक्षित राहावे लागेल. जो माणूस तुमचा जीवनसाथी आहे, जो तुमचा भाऊ आणि वडील देखील आहे, तुम्हाला त्याच्यापासून सुरक्षित राहावे लागेल. तो माणूस एक उत्तम प्रियकर आणि बलात्कारी असू शकतो, म्हणून तुम्हाला तो कोण आहे हे शोधून काढावे लागेल.



### थोडेसे जळते, तेव्हा सुगंध हरवतो...

चांगला सिनेमा विरुद्ध बॉक्स ऑफिस याबद्दलची चर्चा बऱ्याच काळापासून इंडस्ट्रीमध्ये सुरू आहे. या मुद्द्यावर अनुभव सिन्हा म्हणतात, की या दोन्ही वेगळ्या गोष्टी नाहीत. कधीकधी खूप वाईट सिनेमा बॉक्स ऑफिसवर चांगला परफॉर्म करतो, तर कधीकधी चांगला सिनेमा अपयशी ठरतो. सिनेमा हा घटक आहे. दोन्ही गोष्टी एकत्र येतील याची खात्री करण्याचा प्रयत्न केला जातो. पण कधीकधी, चांगला सिनेमा बॉक्स ऑफिसवर चांगला चालत नाही. प्रत्यक्षात असे घडते की, जेव्हा तुम्ही स्वयंपाक करत असता आणि प्रक्रियेदरम्यान काहीतरी चूक होते, उदाहरणार्थ, थोडेसे जळते, तेव्हा त्याचा सुगंध हरवतो. तुम्ही नंतर कितीही सुधारणा केली तरी ती दुरुस्त करता येत नाही. त्याचप्रमाणे, चित्रपट निर्मितीमध्ये, प्रक्रियेदरम्यान अनेकदा चुका होतात, ज्यामुळे सर्वकाही बिघडू शकते. चांगल्या चित्रपटांचे आणि बॉक्स ऑफिसचे हे उदाहरण अनुभव सिन्हा पुढे स्पष्ट करतात, माझ्या 'भीड' आणि 'अफवाह'ला खूप चांगले रिव्ह्यूज मिळाले, पण तो एक वेगळा काळ होता. लोकांचा थिएटरशी संपर्क तुटला होता. ते चित्रपट चुकीच्या वेळी आले. लहान चित्रपटांना जास्त चित्रपटगृहे मिळत नाहीत. 'आर्टिकल १५' च्या एक आठवडा आधी 'कबीर सिंग' प्रदर्शित झाला असला तरी, आमच्या चित्रपटाने ६५ कोटींची कमाई केली.

### 'अस्सी'ची कल्पना दोन वर्षांपूर्वी सुचली...

'अस्सी' सारख्या धाडसी विषयावर इतक्या निर्भयपणे चित्रपट कसा बनवता आला? यावर अनुभव सिन्हा म्हणाले, की मी एका विशिष्ट वेळेवर आधारित चित्रपट बनवत नाही. साधारणपणे जेव्हा मी विमानात असतो किंवा प्रवास करतो तेव्हा मी पुस्तके वाचत नाही किंवा चित्रपट पाहत नाही. मी क्वचितच झोपतो. मी शांत बसतो आणि समाज आणि माझ्या स्वतःच्या जीवनाबद्दलच्या माझ्या विचारांवर चिंतन करतो. कधीकधी एक विचार मनात येतो आणि माझ्या प्रवासात माझ्यासोबत राहतो. या चित्रपटाची कल्पना मला दोन वर्षांपूर्वी सुचली. एक कथा तयार होऊ लागते आणि नंतर मी एका पात्राशी मैत्री करतो. मग मी त्या कथेसाठी एक सह-लेखक शोधतो. गौरव यावर माझा सह-लेखक होता. आम्ही व्यापक चर्चा करतो आणि नंतर मनोरंजक घटकांसह एक कथा विणतो.

### बलात्काराला सामान्य म्हणण्यास माझा विरोध

अनुभव सिन्हा म्हणतात, की 'अस्सी'च्या कथेबद्दल मला सर्वात जास्त त्रासदायक वाटले ते म्हणजे आपण दररोज बलात्काराच्या बातम्या पाहत आहोत आणि आपण ती वाचणे बंद केले आहे. मी त्याच्या सामान्यीकरणाला आक्षेप घेतला. म्हणूनच मी या चित्रपटासाठी 'अर्जंट वॉच' लिहिले. आपल्या देशात दर वीस मिनिटांनी एक बलात्कार होतो. 'अस्सी' या शीर्षकाचा उद्देश तो सर्वांसाठी संस्मरणीय बनवणे हा होता. या चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या वेळी १९८० च्या दशकात देशात अशा घटना घडत होत्या. हा चित्रपट बलात्कारापेक्षा आत्म्याबद्दल अधिक आहेः त्या दुर्घटनेनंतर पुन्हा उठणे आणि आपल्या सत्यासाठी लढणे. ही दोन महिला एकत्र लढण्याची कथा देखील आहे. ही त्यांच्या विजयाची कहाणी आहे.

## चित्रपट समिक्षण

# द केरळ स्टोरी 2 - गोज बियॉन्ड

**२०२३ मध्ये वादंग उठूनही 'द केरळ स्टोरी' चित्रपट बॉक्स ऑफिसवर ब्लॉकबस्टर ठरला. निर्माते विपुल अमृतलाल शाह आता त्याचा सिक्वेल 'द केरळ स्टोरी २: गोज बियॉन्ड' घेऊन आले आहेत. सुदीप्तो सेन यांनी मागील चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते, तर यावेळी कामाख्या नारायण सिंह यांनी दिग्दर्शनाची जबाबदारी स्वीकारली. टीझर प्रदर्शित झाल्यापासून हा सिक्वेल वादात सापडला आहे. हे प्रकरण केरळ उच्च न्यायालयात पोहोचले. न्यायालयाने मान्य केले, की पहिल्या दृष्टीक्षेपात या चित्रपटात सांप्रदायिक सलोखा बिघडवण्याची क्षमता आहे. न्यायालयाने त्याच्या प्रदर्शनावर १५ दिवसांची स्थगिती लादली. केंद्र सरकार आणि सेन्सॉर बोर्डाने न्यायालयात चित्रपटाचा बचाव केला. परिणामी नाट्यमय घटना घडून खंडपीठाने एकल खंडपीठाच्या निर्णयाला स्थगिती दिली. स्थगिती उठवल्यानंतर हा चित्रपट शुक्रवारी, २७ फेब्रुवारी रोजी चित्रपटगृहांत प्रदर्शित झाला. २ तास ११ मिनिटांच्या या चित्रपटात कलाकारांची खरी मेहनत दिसून येते. मात्र ज्या टोनमध्ये कहानी गोंधळ उडवते, पण कथनात त्या खोलीचा अभाव जाणवतो.**

द केरळ स्टोरी २ : गोज बियॉन्ड त्याच्या दोन तासांपेक्षा जास्त काळाच्या रनटाइममध्ये बहुतेक एकाच विषयावर आधारित आहे. तो एक मजबूत सूर सेट करतो, परंतु कथा मोठ्या महत्प्रयासाने पुढे सरकते. परिस्थिती अशी आहे की तुम्हाला शेवटच्या १० मिनिटांतच आराम मिळतो, परंतु तोपर्यंत,




तुमचा संयम आधीच संपलेला असतो. हा चित्रपट हिंदू मुलींच्या जबरदस्तीने धर्मांतर करण्याच्या मुद्द्यावर भाष्य करतो आणि त्यासाठी एकाच समुदायाला एकट्याने आव्हान देतो. पार्श्वसंगीत जोरात आणि नाट्यमय आहे, ज्यामुळे असे दिसते की संपूर्ण जग आता संपणार आहे. हे सामाजिक नाटक एका मजबूत कथानकापेक्षा जड दृश्यांवर आणि भाषणांवर जास्त अवलंबून आहे. २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या पहिल्या चित्रपटात काही मनोरंजक क्षण होते, परंतु हा सिक्वेल खूपच वाईट आहे. सुरुवातीपासूनच कथा कुठे आणि कशी संपेल याचा अंदाज तुम्ही लावू शकता. खरं तर, द केरळ स्टोरी २ मध्ये काहीही नाविन्यपूर्ण नाही. लेखन कमकुवत आहे, पण त्याची हाताळणी खूप जोर देणारी आहे. सूर असे आहेत की जबरदस्ती केली जात असावी, असे वाटते. कथानकात बारकावे आणि खोलीचा अभाव आहे. संपूर्ण चित्रपटात, हिंदू कुटुंबे प्रेमळ आणि आनंदी म्हणून दाखवली आहेत, तर मुस्लिम कुटुंबे मूड आणि दृश्य दोन्ही बाबतीत गडद छटांमध्ये दाखवली आहेत. हा फरक प्रतिबिंबित करण्यासाठी रंगसंगतीदेखील बदलण्यात आली आहे. शेवटी, चित्रपट वास्तविक जीवनातील धर्मांतर प्रकरणांचा संदर्भ देतो आणि काही आरोपींना नंतर अटक करण्यात आल्याचे उघड करते. हो, कलाकारांनी अभिनयात खूप मेहनत घेतली आहे, पण चित्रपटाचा तीव्र स्वर अनेकदा त्यांच्यावर मात करतो. सुरेखा म्हणून उल्का गुप्ता एक शक्तिशाली अभिनय करते, धर्मांतर करण्यास नकार देणाऱ्या मुलीची भूमिका साकारते. अनेक दृश्यांमध्ये तिचा राग आणि गोंधळ खरा भासतो. त्याचप्रमाणे, दिव्याच्या भूमिकेत अदिती भाटिया आणि नेहाच्या भूमिकेत ऐश्वर्या ओझा ठिकठाक आहेत. लग्नानंतरची भीती आणि आघात रेखाटण्यात त्या यशस्वी होतात. असे काही क्षण असतात जेव्हा त्यांच्या शांत प्रतिक्रिया त्यांच्या संवादांपेक्षा जास्त बोलतात. तथापि, पटकथेत त्यांच्या पात्रांना पूर्णपणे साकार करण्यासाठी पुरेशी खोली देण्यात आलेली नाही. द केरळ स्टोरी २ हा चित्रपट स्पष्ट संदेश देतो, संभ्रम न करता स्पष्ट दृष्टिकोन ठेवतो. २०४७ पर्यंत भारत शरिया कायद्याखाली मुस्लिम देश बनू शकतो, असे तो सूचित करतो. चित्रपटात आंतरधर्मीय विवाहांवर चर्चा केली आहे आणि असा दावा केला आहे की धर्मांतर हा देशाच्या लोकसंख्येचा समतोल बदलण्याच्या मोठ्या योजनेचा एक भाग आहे. क्लायमॅक्समध्ये, एका उच्च-स्तरीय आणि भावनिक गाण्यात आरोपींना अटक केली जाते तेव्हा हा सूर अधिक स्पष्ट होतो. चित्रपटातील अनेक दृश्ये त्रासदायक आहेत, ज्यात वारंवार लैंगिक अत्याचार, जबरदस्तीने गोमांस खाणे आणि क्रूर हिंसाचार यांचा समावेश आहे. जबरदस्तीने विवाह आणि धर्मांतरात अडकलेल्या महिलांचे चित्रण करण्यात हा चित्रपट आपल्या मर्यादा ओलांडतो. जरी तो वास्तविक घटनांवर आधारित असल्याचा दावा करत असला तरी, त्याचा मजबूत आणि एकतर्फी सूर स्पष्टपणे सूचित करतो की तो जाणूनबुजून बनवलेला आहे.

**का पाहू नये : जर तुम्ही धर्मांतराच्या गंभीर समस्येवर लक्ष केंद्रित करणारा चित्रपट पाहण्याचा विचार करूनसुद्धा तुम्ही हा चित्रपट पाहण्याचा विचार करत असाल तरीही तो असा नाहीये, की तुम्ही पहावा. योग्य आहे, की तुम्ही तुमचा वेळ आणि पैसा वाचवावा.**

### द केरळ स्टोरी 2 ची कथा

जरी चित्रपटाचे नाव केरळ स्टोरी असले तरी, त्याची कथा भारताच्या वेगवेगळ्या भागातील तीन तरुणींभोवती फिरते : सुरेखा (उल्का गुप्ता), नेहा (ऐश्वर्या ओझा) आणि दिव्या (अदिती भाटिया). कोची येथील सुरेखा हिच्यावर तिचे पालक खूप प्रेम करतात, पण ती सलीम (सुमित गेहलावत) या विवाहित पत्रकाराच्या प्रेमात पडते. सलीम तिला धर्मांतर करण्यास आणि पत्नीला घटस्फोट देण्यास भाग पाडणार नाही, असे वचन देतो. त्याचप्रमाणे, ग्वाल्हेर येथील भालाफेकपटू नेहा उज्ज्वल भविष्याचे स्वप्न पाहते. ती फैजानच्या (अर्जन सिंग औजला) प्रेमात पडते, जो आपली ओळख लपवतो आणि तिला सर्वोत्तम प्रशिक्षण देण्याचे वचन देतो. कथेचा तिसरा भाग जोधपूर येथील दिव्याभोवती फिरतो, एक प्रतिभावान नृत्यांगना जी ऑनलाइन बोल्ड डान्स व्हिडिओ पोस्ट करते. तिचे पालक मान्य करत नाहीत, परंतु जेव्हा ती रशीदला (युक्तम खोसला) भेटते तेव्हा तो लग्नानंतर तिला या सर्वांपासून मुक्त करण्याचे आश्वासन देतो. लग्नानंतरच तिन्ही महिलांना कठोर धार्मिक नियमांचा सामना करावा लागतो आणि त्यांच्या जीवनातील निर्णयाची किंमत कळते.

- » **अभिनेत्री : उल्का गुप्ता, ऐश्वर्या ओझा, अदिती भाटिया**
- » **दिग्दर्शक : कामाख्या नारायण सिंह**
- » **कालावधीः २ तास ११ मिनिटे**
- » **समीक्षक रेटिंग**
- » **१.५/५**

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# व्यवस्था परिवर्तन हेच साहित्याचे अंतिम ध्येय- कवी लोकनाथ यशवंत



**नांदेड (प्रतिनिधी)** –व्यवस्था परिवर्तन हेच साहित्याचे अंतिम ध्येय असले पाहिजे. विद्रोही साहित्याची परंपरा सुरूच असून, त्याची गुणवत्ता काळाच्या कसोटीवर सिद्ध झाली आहे, असे मत २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कवी लोकनाथ यशवंत यांनी केले.

नांदेड येथील नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सदाशिवराव पाटील क्रीडा संकुल मैदानात उभारलेल्या राजा ढाले साहित्य नगरी येथे आजपासून तीन दिवसीय २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाच्या उद्घाटन समारंभात संमेलनाध्यक्ष कवी लोकनाथ यशवंत यांनी सामाजिक परिवर्तन, स्वपरीक्षण आणि मानवमुक्तीचा ठाम संदेश दिला. कविता ही आपल्या जीवनाचा श्वास असून, ती सामाजिक वास्तवाची पहिली प्रतिक्रिया असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, चळवळीतील नेतृत्त्व आणि स्वपरीक्षण या मुद्द्यांवर भाष्य करताना त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा संदर्भ दिला. काफिला पुढे न्या, पण मागे खेचू नका, हा संदेश स्मरणात ठेवण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. नेतृत्वातील स्वार्थी प्रवृत्तीमुळे चळवळीचे नुकसान होते, याकडे त्यांनी लक्ष वेधले. जो इतिहास विसरतो तो इतिहास घडवू शकत नाही, असे त्यांनी सांगितले. धर्माच्या नावाखाली वाढणाऱ्या अंधश्रद्धा आणि दंगलींवर त्यांनी तीव्र टीका केली. धर्म माणसासाठी असावा, माणूस धर्मासाठी नसावा, अशी स्पष्ट भूमिका मांडत विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन स्वीकारण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. जागतिकीकरणामुळे सामान्य माणसाचे होणारे नुकसान आणि महासत्तांच्या स्वार्थी धोरणांवर त्यांनी भाष्य केले. माहिती तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले असले तरी मनं जुळली नाहीत, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

बायोस्कोप या चित्रपटात समाविष्ट झालेल्या त्यांच्या बैल कवितेचा उल्लेख करत त्यांनी शेतकरी आणि श्रमिकांच्या प्रश्नांवर प्रकाश टाकला. कविता ही केवळ घोषणाबाजी नसून क्रांतिदर्शी, क्रांतिसन्मुख आणि परिवर्तनशील असावी, असे त्यांनी स्पष्ट केले. संमेलनाध्यक्षपदाची संधी दिल्याबद्दल आयोजकांचे आभार मानत त्यांनी आपल्या भाषणाची सांगता केली.

यावेळी उद्घाटक डॉ. बजरंग बिहारी तिवारी यांनी विद्रोही साहित्याचे महत्व अधोरेखीत केले. मावळते संमेलनाध्यक्ष डॉ. अशोक राणा, दिल्लीतील जेएनयू विद्यापीठातील प्रा. डॉ. मिलिंद आव्हाड यांनीही आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेंद्र गोणारकर यांनी केले तर स्वागताध्यक्ष राहुल एस. एम. प्रधान यांनी सर्व साहित्यिक व साहित्य प्रेमींचे नांदेड नगरीत स्वागत केले.

# महाशिबीर व योजनांच्या महामेळाव्यातून कायद्याची माहिती व शासकीय योजना लोकांपर्यंत पोहोचवा -न्यायमूर्ती नीरज धोटे

**भोकर (प्रतिनिधी)** – संविधानानुसार समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळणे हा त्यांचा हक्क आहे. वंचित घटक मोफत न्याय व शासकीय योजनांपासून वंचित राहू नयेत, यासाठी विधीसेवा प्राधिकरणामार्फत सातत्याने शिबिरे आयोजित केली जातात. या महाशिबिराच्या माध्यमातून अधिकाधिक नागरिकांपर्यंत कायद्याची माहिती व विविध शासकीय योजना पोहोचवाव्यात, असे आवाहन मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती नीरज पी. धोटे यांनी केले.

विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा प्रशासन, तालुका विधी सेवा समिती भोकर व अभिवक्ता संघ भोकर यांच्या संयुक्त विद्यमाने भोकर येथील हनुमान नगर, किनवट रोडवरील खुले मैदान येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय सेवांचा महामेळावा आयोजित करण्यात आला होता. न्यायमूर्ती नीरज धोटे यांच्या हस्ते वृक्षांना पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र के. ब्रम्हे, तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष मोहम्मद नासिर मो. सलीम, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव शरद देशपांडे, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय अधिकारी प्रवीण मेगशेट्टी, अभिवक्ता संघ भोकरचे अध्यक्ष पी. आर. तपांचाळ यांच्यासह न्यायाधीश, विविध विभागांचे अधिकारी, विधीज्ञ व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी बंजारा नृत्याचे सादरीकरण केले.

न्यायमूर्ती नीरज धोटे म्हणाले, शासन विविध कल्याणकारी योजना राबवित असले तरी अनेकांना त्यांची माहिती नसते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या मेळाव्यातील सर्व स्टॉलना भेट देऊन योजनांची माहिती घ्यावी व त्यांचा लाभ घ्यावा. येत्या १४ मार्च रोजी आयोजित लोकअदालतीत प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी पक्षकार व विधिज्ञांनी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

### प्राचार्य डॉ. अशोक गवते पाटील यांना जीवनगौरव



**समान न्याय व आर्थिक समानता हा प्रत्येकाचा हक्क** –न्यायाधीश नरेंद्र ब्रम्हे

प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष नरेंद्र ब्रम्हे यांनी संविधानातील कलम ३९ (अ) नुसार समान न्याय व आर्थिक समानता हा प्रत्येकाचा हक्क असल्याचे सांगितले. न्याय्य मागण्यांची संधी प्रत्येकाला समान आहे. विधी सेवा प्राधिकरणाच्या विविध समित्यांमार्फत कायदेविषयक जनजागृती केली जाते. या महाशिबिराचा उद्देश वंचित घटकांना कायद्याची माहिती व शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हा आहे. आपण या माध्यमातून कायदेशीर साक्षरतेकडून कायदेशीर सक्षमतेकडे वाटचाल करीत आहोत, असे त्यांनी सांगितले. यावेळी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष मोहम्मद नासिर, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व अभिवक्ता संघ भोकरचे अध्यक्ष पी. आर. पांचाळ यांनीही मनोगत व्यक्त केले.

**मान्यवरांच्या हस्ते लाभांचे वितरण**

महामेळाव्यात विविध योजनांच्या लाभार्थ्यांना मदत व आदेशपत्रांचे वितरण करण्यात आले. तहसील कार्यालयामार्फत शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबातील वारसांना प्रत्येकी एक लाख रुपयांचे अनुदान देण्यात आले. तसेच संजय गांधी निराधार योजना, प्रधानमंत्री आवास योजना, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत बेबी केअर किट, कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत ट्रॅक्टर वितरण, गोपीनाथ मुंडे, शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत प्रत्येकी दोन लाख रुपयांचे अनुदान आदींचे वितरण करण्यात आले. आरोग्य, शिक्षण व विद्युत विभागाकडूनही विविध प्रमाणपत्रे व लाभ देण्यात आले.

महामेळाव्यात विविध विभागांचे एकूण पन्नास स्टॉल उभारण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तदर्थ जिल्हा न्यायाधीश बाळासाहेब यू. चौधरी व वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश अच्युत पी. कराड यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिव शरद देशपांडे यांनी केले. कार्यक्रमानंतर मान्यवरांनी सर्व स्टॉलना भेट देऊन पाहणी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भोकर न्यायालयातील न्यायाधीश, अभिवक्ता संघ, अधिकारी, कर्मचारी, नगरपरिषदेचे अधिकारी कर्मचारी, पोलीस प्रशासनातील अधिकारी कर्मचारी यांच्यासह प्रशासनातील सर्व विभागातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

### जानापुरीजवळील घटना

**नांदेड (प्रतिनिधी)** –लोहा तालुक्यातील सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत अज्ञात वाहनाने जबर धडक दिल्यामुळे दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. सदर घटना शनिवारी सकाळी जानापुरी जवळील एका हॉटेलच्या समोर घडली.

खुरगाव ता. अर्धापूर येथील मन्मथ बालाजी मेंगाळे (वय ४२) हे दुचाकी क्र. (एमएच २६-एम- ५८७५) वरून शनिवारी नांदेड येथून सोनखेडकडे जात होते. सकाळी १० च्या सुमारास अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीस नांदेड-लातूर महामार्गावरील जानापुरी जवळ जबर धडक दिली. यात ते जागीच ठार झाले. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक माने यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

या प्रकरणी अज्ञात वाहन चालकावर सोनखेड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून, उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला आहे.

# अरविंद केजरीवालांची निर्दोष मुक्तता; नांदेडमध्ये आम आदमी पार्टीचा जल्लोष

**नांदेड (प्रतिनिधी)** –आम आदमी पार्टीचे सर्वेसर्वा तथा राष्ट्रीय संयोजक व दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल व राष्ट्रीय नेते मनिष सिसोदिया यांची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. याचा आनंदोत्सव जिल्हा आम आदमी पार्टीच्या वतीने शनिवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नंतर आतीषबाजीसह नागरिकांना पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला.

सदरील कार्यक्रम हा आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष ॲड. जगजीवन भेदे, ज्येष्ठ नेते नरेंद्रसिंघ ग्रंथी, शहराध्यक्ष



प्रा. देवीदास शिंदे, जिल्हा सचिव डॉ. अवधूत पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष बालाजी नागेश्वर, कार्यकर्ते अमर वाघमारे, ॲड. संतोष जोंधळे, शेतकरी आघाडीचे विठ्ठलराव पवार, उत्तम लांडगे, ॲड. विकास वाघमारे, ॲड संग्राम गायकवाड, अँड के. के. कापुरे, ॲड. सदावर्ते यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीमती सारजाबाई कंगारे यांचे निधन

**अर्धापूर (प्रतिनिधी)** – तालुक्यातील कामठा येथील



ज्येष्ठ नागरिक श्रीमती सारजाबाई गंगाराम कंगारे यांचे शनिवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी रात्री आठ वाजता देवाज्ञा झाली असून, त्यांचा अंत्यविधी रविवार, दि. १ मार्च रोजी दुपारी १२ वा. त्यांच्या शेतात कामठा (बु) येथे करण्यात येणार आहे. श्रीमती सारजाबाई गंगाराम कंगारे यांच्या पश्चात १ मुलगा, २ मुली, सुना, नातू असा परिवार आहे. त्या पत्रकार बसवेश्वर हायस्कूलचे व जुनिअर कॉलेज सचिव शंकर कंगारे यांच्या आई होत.

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीस उच्च न्यायालयाने शिक्षा वाढवून ठोठावली २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)** –अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार करणाऱ्यास वीस वर्षांच्या जन्मठेपेची शिक्षा उच्च न्यायालयाने ठोठावली आहे.

शहरातील भाग्यनगर पोलीस स्टेशन येथे दि. २१ जानेवारी २०२२ रोजी यातील फिर्यादी यांनी तक्रार दिली की, त्यांच्या अल्पवयीन मुलीस आई-वडिलांच्या कायदेशीर रखवालीतून कुणीतरी अज्ञात इसमाने पळवून नेल्याची तक्रार दिली. या तक्रारीवरून पो.स्टे. भाग्यनगर येथे गु.र.नं. २५/२०२२ कलम ३६३ भादवीप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याच्या तपासात गुन्ह्यात कलम ३६६ (अ), ३७६ (१) भादंवी सहकलम ४.५(२), ६, ९, १० बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण अधिनियमाप्रमाणे कलम वाढ करण्यात आली व आरोपी संतोष मारोती भंडारे (वय २५ वर्षे, रा. बहाद्दरपुरा, कंधार) याच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणात सत्र न्यायालय नांदेड यांनी आरोपीस ७ वर्षे शिक्षा व ५ हजार रूपये द्रव्यदंड अशी शिक्षा सुनावली होती.

सदर गुन्ह्याचा तपास पोउपनि श्रीमती ननवरे यांनी करून भक्कम पुरावे गोळा करून न्यायालयात आरोपी विरूध्द दोषारोप सादर केले. सदर प्रकरणात उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांनी सरकार पक्षाच्या वतीने पुरावे ग्राह्य धरून आरोपी संतोष मारोती भंडारे, वय २५ वर्षे, रा बहादुरपुरा, ता. कंधार यास कलम ३६३,३६६ (अ), ३७६ (१) भा दं वी सहकलम ४,५ (२),६,९,१० बालकांचे लैंगीक गुन्ह्यांपासुन संरक्षण अधिनियम अंतर्गत २० वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.

# लातूरकर यांच्या मध्यस्थीमुळे कुलकर्णी यांचे उपोषण मागे

**नांदेड (प्रतिनिधी)** – घराच्या जागेची नोंद ग्रामपंचायतीमध्ये मंदिर ट्रस्टच्या नावे केल्यामुळे उपोषणाला बसलेल्या लोहगाव येथील सुनील कुलकर्णी यांनी सुरू केलेले बेमुदत उपोषण अ. भा. ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांच्या मध्यस्थीने मागे घेतले.

बिलोली तालुक्यातील लोहगाव येथे ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक यांच्या संगनमताने एकाच घराच्या नोंदी महादेव मंदिर ट्रस्टच्या नावे लावल्याचे निदर्शनास आल्याने ही माझी स्वतःची जागा परस्पर प्रशासकीय यंत्रणेचा वापर करत हा प्रकार घडला जात असल्याचे समजल्यानंतर न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करूनही मला न्याय मिळत नाही. त्यामुळे सुनील सुरेशराव कुलकर्णी हे बेमुदत उपोषणाला बसले होते. उपोषणास ५ दिवस पूर्ण होऊनही



प्रशासनाने विशेष दखल घेतली नाही. ही बाब अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांच्या निदर्शनास येताच त्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलीस प्रशासनाशी संपर्क साधला. लातूरकरांनी परिपूर्ण प्रयत्न करून आंदोलनस्थळी प्रत्यक्ष भेट देत आंदोलनकर्ते सुनिल कुलकर्णी यांची समजूत काढली. तहसीलदारांकडून परिपूर्ण मदतीचे आश्वासन मिळाल्याने कुलकर्णी यांनी उपोषण मागे घेतले.

# शिवाजी महाराजांचे समतावादी स्वराज्य मानवी स्वातंत्र्य व समतेवर आधारित होते - न्या. प्रियंका चिद्रे



**लोहा (प्रतिनिधी)** – शिवाजी महाराजांचे समतावादी स्वराज्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान मानवी स्वातंत्र्य आणि समतेवर आधारित होते, असे प्रतिपादन येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश श्रीमती प्रियंका चिद्रे यांनी अध्यक्षपदावरुन बोलताना केले. यावेळी दिवाणी न्यायाधीश तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी निरंजन चव्हाण, व्याख्याते प्रा. डॉ. जयराज सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

अभिवक्ता संघाच्यावतीने न्यायालयात शिव व्याख्यान प्रसंगी न्या. चिद्रे बोलत होत्या. शिवाजी महाराजांनी स्त्री सन्मान आणि न्यायव्यवस्थेला विशेष स्थान दिले असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. न्या. चव्हाण यांनी शिवाजी महाराज यांच्या कार्याविषयी माहिती देऊन लोकअदालतीच्या माध्यमातून प्रकरणे निकाली काढण्यासाठी विधिज्ञांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

प्रा. सूर्यवंशी यांनी शिवाजी महाराज यांचे कार्याविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन ॲड. विजय पवार यांनी केले तर शेवटी ॲड. व्ही. टी. मच्छेवार यांनी आभार मानले.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज व श्री संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अभिवक्ता संघाचे अध्यक्ष ॲड. राजगुरु दासरे, सहायक सरकारी अभियोक्ता सागर पाटील व मनिषा गायकवाड, सहायक अधीक्षक विनोद सुरकुटवार, ॲड. डी. पी. बाबर, ॲड. जी. एस. डांगे, ॲड. पी. यू. कुलकर्णी, ॲड. एस. एल. लुंगारे, ॲड. क्षीरसागर, ॲड. जे. वाय. पठाण, ॲड. बी. आर. गायकवाड, ॲड. व्ही. एन. घोडके, ॲड. एन. के. वरपडे, ॲड. के. एस. क्षीरसागर, ॲड. पंडित शेटे, ॲड. बी. एम. गोरे, ॲड. एस. जी. जाधव, ॲड. तुषार बाबर, ॲड. व्ही. एम. चव्हाण, ॲड. ए. एन. मोटरवार, ॲड. ए. बी. गवते, ॲड. एच. एम. पाटील, ॲड. एस. डी. पोतदार, ॲड. एस. एम. फुके, ॲड. विजय दिग्रसकर, ॲड. एन. व्ही. ठोंबरे, ॲड. ताटीकोंडलवार, ॲड. चौतमल आदी विधीज्ञ व इतर न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

# निवृत्तीराव वडगावकर यांना 'ग्रंथ महर्षी गंगाधर पटने जीवनगौरव सन्मान' जाहीर

**बाऱ्हाळी (प्रतिनिधी)** – नांदेड जिल्हा ग्रंथालय संघाच्या २८ व्या वार्षिक अधिवेशनात यंदाचा प्रतिष्ठेचा 'ग्रंथ महर्षी गंगाधर पटने जीवनगौरव सन्मान' निवृत्तीराव वडगावकर यांना जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या निवडीमुळे ग्रंथालय क्षेत्रात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम राहणार असून, उद्घाटन खा. रविंद्र वसंतराव चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. तसेच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. मान्यवरांच्या उपस्थितीतच निवृत्तीराव वडगावकर यांना जीवनगौरव सन्मान प्रदान करण्यात येणार आहे.

ग्रंथालय चळवळीच्या उभारणीत वडगावकर यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय आहे. ग्रामीण भागात वाचन संस्कृती रुजविणे, ग्रंथालयांचे जाळे बळकट करणे आणि तरुण पिढीला ज्ञानसंपादनासाठी प्रोत्साहित करणे या क्षेत्रात त्यांनी दीर्घकाळ कार्य केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत यापूर्वीही त्यांना सन १९८५ मध्ये 'ग्रंथालय भूषण' पुरस्कार तसेच सन १९८७ मध्ये 'तात्यासाहेब शेनई खटखटे ग्रंथालय पुरस्कार' प्रदान करण्यात आले होते.

हे अधिवेशन रविवार, दि. १ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जनता हायस्कूल, नायगाव येथे आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनात आजची समाजमाध्यमे, वाचन संस्कृती आणि आत्मनिर्भरता या विषयावर विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील ग्रंथपाल, वाचनप्रेमी नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे आयोजकांनी कळविले आहे.

STATEMENT ABOUT OWNERSHIP AND OTHER PARTICULARS OF **GODATEER SAMACHAR**, NANDED AS REQUIRED UNDER RULES 8 OF THE REGISTRATION OF NEWSPAPERS (CENTRAL) RULES, 1956

**FORM-IV**
(SEE RULE 8)

1. Place of Publication : 102-C, Co-operative Industrial Estate, Shivaji Nagar, Nanded- 431602
2. Periodicity of its Publication : Daily
3. Printer's Name : **Keshav Madhukarrao Ghonse Patil** Seva Communications, 102-C, Co-operative Indutrial Estate, Shivaji Nagar, Nanded- 431602
Whether Citizen of India : Yes
Address : Venkatesh Nagar, Nanded- 431 601
4. Publisher's Name : **Keshav Madhukarrao Ghonse Patil**
Whether Citizen of India : Yes
Address : Venkatesh Nagar, Nanded- 431 601
5. Editor's Name : **Keshav Madhukarrao Ghonse Patil**
Whether Citizen of India: : Yes
Address : Venkatesh Nagar, Nanded- 431 601
6. Name and address of individuals who own the newspaper : **Godateer Media Network,** Venkatesh Nagar, Near Khadi Bhandar, Nanded- 431601
AND Shareholders holding more than one percent of the total capital : **Keshav M. Ghonse Patil,** Venkatesh Nagar, Near Khadi Bhandar, Nanded- 01 (100%)

Date: **01 March 2026**

Sd/-
**Keshav Madhukarrao Ghonse Patil**
Publisher

I, Keshav M. Ghonse Patil, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com